सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. १६ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ७४ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला; २५ ते ३० पर्यटक बुडाल्याची भीती



पुणे , १५ जून : मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे आज(दि.१५) इंद्रायणी नदीवरील जुना पूल कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत २५ ते ३० पर्यटक नदीत बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना तळेगाव दाभाडे शहराच्या लगत असलेल्या प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे घडली. रविवार असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होती. याच गर्दीत काही पर्यटक पुलावर थांबले असताना अचानक पूल कोसळला आणि अनेक जण थेट नदीत पडले.प्राथमिक माहितीनुसार, २५ ते ३० पर्यटक नदीत बुडाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, ग्रामस्थ आणि आपदा मित्र यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. दोन दिवसांपासून मावळ परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. पाण्याचा प्रवाह प्रचंड वेगवान असून बचावकार्यात अडथळे येत आहेत. दरम्यान, स्थानिक प्रशासन, अग्निशमन दल आणि एनडीआरएफ पथक घटनास्थळी रवाना झाले असून, परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. घटनेबाबत अजून अधिकृत दुजोरा मिळालेला नसला, तरी दुर्घटनेचे गांभीर्य लक्षात घेता प्रशासन सतर्क झाले आहे.

### अमेरिकन महावाणिज्य दूतावास कार्यालयाला उडवण्याची धमकी

मुंबई : मुंबईतील अमेरिकन महावाणिज्य दूतावास कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. ही माहिती मिळताच महावाणिज्य दूतावास कार्यालयाने पोलिसांना माहिती दिली. मुंबई पोलिसांनी यानंतर सखोल तपासणी केली. पण काहीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. अखेर मुंबई पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात धमकी दिल्याचा गुन्हा नोंदवला आणि तपास सुरू केला आहे.

याआधी ३१ जून रोजी मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलला धमकीचा फोन आला होता. हॉटेल प्रशासनाने पोलिसांना माहिती दिली होती. पोलिसांनी सखोल तपासणी केली पण कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. यानंतर मुंबई पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात धमकी दिल्याचा गुन्हा नोंदवला आणि तपास सुरू केला.

# परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार : मुख्यमंत्री

### पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना आशयपत्र प्रदान कार्यक्रम संपन्न



मुंबई : भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही. शनिवारी राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब मुंबई, नवी मुंबईत उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल ताज येथे 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या पाच जागतिक विद्यापीठांना (एलओआय) आशयपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय शिक्षण सचिव तथा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी, अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, ब्रिटनच्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, ऑस्ट्रेलियाचे कॉन्सुल जनरल पॉल मर्फी, अमेरिकेचे कॉन्सुल जनरल माईक हँकी, इटलीचे कॉन्सुल जनरल वॉल्टर फेरारा, ॲबर्डीन विद्यापीठाचे उपप्राचार्य ग्लोबल एंगेजमेंट प्रा. सिलादित्य भट्टाचार्य, यॉर्क विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. चार्ली जेफ्री, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ उपकुलगुरू गॉय लिटलफेअर, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष इलिनॉय टेक राज ईचंबाडी, आयईडी चे रिकार्डो बाल्बो,अधिष्ठाता,विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठे उभी राहणार आहेत. याचं परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी, स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे.

# हेलिकॉप्टर अपघातात महाराष्ट्रातील तिघांचा मृत्यू



रुद्रप्रयाग : उत्तराखंडच्या रुद्रप्रयाग जिल्ह्यातील गौरीकुंड येथे प्रतिकूल हवामानामुळे हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात हेलिकॉप्टर चालक आणि सहा प्रवासी अशा सात जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील वणीच्या जयस्वाल कुटुंबातल्या तीन जणांचा समावेश आहे. राजकुमार जयस्वाल (४२), श्रद्धा जयस्वाल (३४) आणि काशी जयस्वाल (२) यांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला. हे सर्व जण केदारनाथ येथे दर्शनासाठी जात होते.

जयस्वाल कुटुंबीय आणि गुजरात, उत्तरप्रदेशातील काही भक्त आर्यन एविएशनच्या हेलिकॉप्टरमध्ये प्रवास करत होते. गौरीकुंड – सोनप्रयागच्या जंगलात प्रतिकूल हवामान आणि कमी दृश्यमानता यामुळे हेलिकॉप्टर भरकटले. थोड्या वेळाने हेलिकॉप्टरचा अपघात झाला. या अपघातात कॅप्टन राजबीरसिंग चौहान आणि सहा प्रवासी अशा सात जणांचा मृत्यू झाला.

अपघातामध्ये राजकुमार जयस्वाल, त्यांची पत्नी श्रद्धा आणि मुलगी काशी यांचा मृत्यू झाला. जकुमार जयस्वाल हे वणीत राजा या नावाने ओळखले जात. वणीतील धार्मिक आणि सामाजिक कार्यात हे कुटुंब अग्रेसर होते. अलिकडेच त्यांनी वणी येथे पंडीत प्रदीप शर्मा यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन केले होते. ते शिवभक्त होते. मुलीसोबत चारधाम यात्रा करण्याचा संकल्प केला होता म्हणून जयस्वाल दांपत्य काशीला घेऊन यात्रेसाठी निघाले होते. जयस्वाल दांपत्याचा मुलगा विवान हा पांढरकवडा येथे आजोबांकडे असल्याने या प्रवासात सोबत नव्हता.

पहाटे पाच वाजून १७ मिनिटांनी आर्यन कंपनीच्या हेलिकॉप्टरने सहा भाविक आणि हेलिकॉप्टर चालक असे सात जण केदारनाथ हेलिपॅड येथून गुप्तकाशीसाठी रवाना झाले. हेलिकॉप्टरने केदारनाथ हेलिपॅड येथून उड्डाण केले. पुढे मार्गात गौरीकुंड – सोनप्रयागच्या जंगलात प्रतिकूल हवामान आणि कमी दृश्यमानता यामुळे हेलिकॉप्टर भरकटले आणि कोसळले. राजवीर असे हेलिकॉप्टरच्या चालकाचे अर्थात पायलटचे नाव आहे. विक्रम रावत, विनोद, तृष्टी सिंह, राजकुमार, श्रद्धा आणि राशी अशी इतर मृतांची नावं आहेत. केदारघाटीमध्ये प्रचंड धुके आणि वेगाने वारा वाहत होता. या प्रतिकूल परिस्थितीत हेलिकॉप्टरचा संपर्क तुटला आणि गौरीकुंडच्या जंगलात ते कोसळले.

### पंतप्रधान मोदी तीन देशांच्या दौऱ्यासाठी रवाना

नवी दिल्ली , १५ जून – 'ऑपरेशन सिंदूर' नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदाच विदेश दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत. सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या तीन देशांचा पाच दिवसीय दौरा ते करणार आहेत.त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि.१५) सायप्रसला रवाना झाले. कॅनडामध्ये होणाऱ्या जी–७ शिखर परिषदेत ही पंतप्रधान मोदी सहभागी होणार आहेत.

१५ ते १८ जून दरम्यान पंतप्रधान मोदी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशियाला या तीन देशांच्या परदेश दौऱ्यावर असणार आहेत. दोन दशकांत भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच सायप्रस दौरा आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, १५–१६ जूनचा हा दौरा सायप्रस प्रजासत्ताकाचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिडेस यांच्या निमंत्रणावरून होत आहे. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडौलिडेस यांच्यात राजधानी निकोसियामध्ये चर्चा होईल. ते लिमासोलमध्ये उद्योजकांना संबोधित करतील.

# मुंबई मनपा उद्धव ठाकरेंसाठी अस्तित्वाची लढाई, कामाला लागण्याचे शाखाप्रमुखांना आदेश

मुंबई, १५ जून : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. त्यात मुंबई महापालिका निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहेत. शिवसेना ठाकरे गटासाठी तर ही राजकीय अस्तित्वाची लढाई असणार आहे. यासाठीच ठाकरे गटाकडून विधानसभा निहाय निरीक्षक नेमून नियोजनबद्ध बैठका घेतल्या जात आहेत. या बैठकीद्वारे स्थानिक पातळीवरील संघटन बांधणी, निवडणूक रणनीती, उमेदवार निवड प्रक्रिया आणि कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावण्यावर भर दिला जात आहे. एकूणच शागा प्रमुखांना कामाला लागा, असे आदेश ठाकरेंनी दिले आहेत.

मुंबई महापालिकेसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्य सरकारने प्रभाग रचनेचे आदेश जारी केल्यानंतर सगळेच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना भवन येथे मुंबईतील सर्व शाखा प्रमुखांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्वतः उपस्थित राहून थेट मार्गदर्शन केले. याआधी निरीक्षकांमार्फत गटनिहाय संवाद साधण्यात आला होता. मात्र आता ठाकरे यांनी स्वतः मैदानात उतरत, शाखा प्रमुखांना एकत्रित संबोधित करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये मुंबईतील विविध वॉर्डातील परिस्थिती, स्थानिक नेतृत्वाची ताकद, तसेच गेल्या काही वर्षांतील घडामोडींचा आढावा घेण्यात येणार असल्याचे पक्षातील सूत्रांनी सांगितले.

ठाकरे म्हणाले की, दोन व्यापाऱ्यांना आणि भाजपला मुंबई महानगरपालिका ताब्यात घ्यायची आहे, त्याच्यामध्ये उद्धव ठाकरे आहे, उद्धव ठाकरे आणि आपल्या पक्षाला संपवून त्यांना महानगरपालिका ताब्यात घ्यायची आहे पण त्याच्यामध्ये आपण आहोत. मुंबई आपली आई आहे ती विकू देऊ नका. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १०५ हुतात्म्यांनी रक्त सांडलं, तेव्हा मुंबई आपल्याला मिळाली. ती मुंबई व्यापाऱ्यांच्या हातात जाऊ द्यायची नाही, असं म्हणत मुंबई महापालिका जिंकण्यासाठी कामाला लागण्याच्या सूचना उध्दव ठाकरेंनी दिल्या आहेत.

सात वर्षांनंतर मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होत आहे. पुनःश्च एकदा मुंबई महानगरपालिकेवर आपला भगवा फडकविण्याच्या इर्षे ने आपण कामाला लागायचे आहे. त्यासाठी संघटना बांधणी अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येक शाखेतील शाखाप्रमुख ते गटप्रमुख आणि पोलिंग एजंट पर्यंतची कार्यकारिणी सदृढ, कार्यक्षम आणि अभ्यासू असणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेत शाखा प्रमुख हे अतिशय महत्त्वाचे पद आहे. शाखाप्रमुख हे वॉर्डनिहाय असतात. त्याशिवाय, शाखाप्रमुखांचा स्थानिक पातळीवरील अनेक मुद्द्यात हस्तक्षेप असतो. स्थानिक जनतेमध्ये त्यांचा थेट संपर्क असतो. महापालिका निवडणुकीत ठाकरे गटासाठी शाखाप्रमुखच महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर अनेक नेत्यांनी उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र केला. मात्र, स्थानिक पातळीवरील बहुतांशी शाखाप्रमुख हे ठाकरेंसोबत राहिले. आता, याच संघटनात्मक आधारावर ठाकरे मुंबई महापालिकेचे मैदान मारण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# मणिपूरमध्ये ३२८ बंदुकांसह मोठा शस्त्रसाठा जप्त



इम्फाल : मणिपूर पोलिस, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (सीएपीएफ), लष्कर आणि आसाम रायफल्सच्या संयुक्त पथकांनी मणिपूरच्या इंम्फाल खोऱ्यातील ५ जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त केला आहे. यामध्ये ३२८ स्वयंचलीत बंदुकांसह मोठ्या प्रमाणात हँडग्रेनेड आणि दारूगोळ्याचा समावेश असल्याची माहिती माहिती अतिरिक्त पोलीस महानिरीक्षणक लहरी दोरजी लहटू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सुरक्षा दलांनी १३ व १४ जूनच्या मध्यरात्री इंफाळ पूर्व, इंफाळ पश्चिम, बिष्णुपूर, काकचिंग आणि थौबल जिल्ह्यांत ही धडक कारवाई करत स्फोटके आणि इतर शस्त्रसामग्री जप्त केली. यामध्ये १५१ एसएलआर रायफल्स, ६५ इन्सास रायफल्स, इतर प्रकारच्या ७३ रायफल्स, ५ कार्बाइन गन, २ एमपी–५ गन अशा एकूण ३२८ स्वयंचलीत बंदुकी आणि दारुगोळा जप्त करण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे मणिपूर पोलीस आणि सुरक्षा दलांनी सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी आणि नागरिकांची आणि त्यांच्या मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ही कारवाई केली आहे, असेही लहटू यांनी स्पष्ट केले.

भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सने स्पीअर कॉर्प्सच्या नेतृत्वाखाली, २६ मे ते ५ जून दरम्यान मणिपूर पोलिस, सीआरपीएफ, बीएसएफ आणि आयटीबीपी यांच्या समन्वयाने कांगपोक्पी, थौबल, काकचिंग, तेंग्नौपाल, बिष्णुपूर, जिरीबाम, इम्फाळ पूर्व आणि इम्फाळ पश्चिम या डोंगरी आणि खोऱ्यातील जिल्ह्यांमध्ये गुप्तचर यंत्रणांवर आधारित ऑपरेशन्स सुरू केल्या, असे एका निवेदनात म्हटले आहे. या ऑपरेशन्समध्ये २३ फुटीरवाद्यांना अटक करण्यात आली आहे.

# सोयगाव शहरात अतिवृष्टी;-शहरातील काळेनगर येथील नाल्याचे पाणी घरात घुसून नुकसान

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१५ जून

सोयगाव शहरात रविवारी (दि.१५) पहाटे तीन वाजेपासून दोन तास जोरदार पावसाने हजेरी लावली या आलेल्या पावसाने सोयगाव शहरात झालेल्या पावसाने शहरातील रस्त्यावर पाणीच पाणी वाहू लागले होते.तर शहरातील काळे नगर भागातील रहिवासी यांच्य घरात पाणी साचलेले होते.या झालेल्या पावसाने पहिली अतिवृष्टीची नोंद झाली आहे.या पावसाने शहरात जोरदार हजेरी लावली होती त्यामुळे सोयगाव शिवारातील कोवळी मक्याचे अंकुर वाहून गेली असून शेतात



पाणी साचले आहे शहरासह परिसरात ही या पावसाने जोरदार मुसंडी मारली होती दरम्यान पहिल्याच पावसाने शहराजवळील गवळण नाल्याला पूर आला होता दरम्यान परिसरात सोयगाव, गलवाडा,वेताळवाडी, आमखेडा, या भागात मुसळधार तर इतर ठिकाणी दमदार पावसाने रविवारी हजेरी लावली सोयगाव शहरात झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने शहराजवळील पाझर तलावात पाण्याची आवक वाढली आहे वेताळवाडी धरणातही नवीन पाण्याची आवक वाढली आहे दरम्यान रविवारी झालेल्या पावसाने सोयगाव मंडळात खरिपाच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आल्या आहे सोयगाव मंडळात आतापर्यंत ६४ टक्के पेरण्या झालेल्या आहे रविवारी हा आकडा वाढला आहे जरंडी मंडळात सर्वाधिक नीचांकी २१ मी मी सोयगाव मंडळात ६५ मी मी सावळदबारा मंडळात ४० मी मी तर ब नोटी मंडळात २३ मी मी पावसाची नोंद झाली आहे तालुक्यात रविवारी खरीप पेरण्याना वेग आला होता कपाशी सह मका,मूग,उडीद, ज्वारी, बाजरी,सोयाबीन, आदी पिकांच्या खरिपाच्या पेरण्या सुरु झालेल्या आहे

रविवारी पहाटे झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील वेताळवाडी धरणात पाण्याची आवक वाढली आहे त्यामुळे आता पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे.




सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पर्यावरण

पूनम नेगी



# जैवविविधता : जपा निसर्गाचा अनमोल ठेवा...

जैवविविधता हा निसर्गाने मानवाला दिलेला बहुमोल ठेवा आहे. गेल्या शंभर वर्षांत आपण तथाकथित विकासाच्या कल्पनांमुळे हा ठेवा जपण्याऐवजी त्याची लूटच केली आहे. जगभर बदलत असणारे ऋतुमान, हवामानातील तीव्र बदल, अवकाळी पाऊस, सततचा दुष्काळ आणि झपाट्याने नष्ट होणारे पशू-पक्षी-वनस्पतींचे विश्व हे त्याचेच परिणाम आहेत. जैवविविधता टिकवली तरच या सा:यांचे अस्तित्व राहणार आहे. त्यामुळे जैवविविधता जपण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे, असा इशारा व धोक्याची सूचना पर्यावरणतज्ज्ञ आणि निसर्गप्रेमींनी दिला आहे. पक्ष्यांचे जीवन हा जैवविविधता जपण्याचा सोपा मापदंड आहे. विशिष्ट पक्षी विशिष्ट वृक्षांवरच किंवा त्यांच्या आसपास आढळतात. ते विशिष्ट झाडांची वा वेलींचीच फळे, पाने खातात. ठरावीक झाडांवरच त्यांची घरटी करतात. आपल्याकडे विदेशी वृक्ष लावले जातात, पण स्थानिक पक्षी अशा झाडांवर घरटीच काय पण वावरतानाही दिसत नाहीत. त्यामुळे जैवविविधता जपणे, वाढवणे अतिशय महत्त्वाचे आहे.

निसर्गातील सर्व सजीव स्वतःच्या अस्तित्वासाठी एका अन्नसाखळीत गुंफलेले असतात. त्यांचे स्वरूप हे अधिवासावर अवलंबून असते. त्यानुसार त्यांची शारीरिक जडणघडण असते. अधिवासातील सजीवांचे अस्तित्व दुसऱ्या सजीवाला जगण्यासाठी मदतच करीत असतात. अधिवास संरक्षित केल्यास वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण कमी होऊ शकते. आपण हवा, पाणी, अन्न, निवारा, नैसर्गिक सौंदर्य, यासाठी निसर्गातील सजीवांवरच अवलंबून आहोत. मृत्यूनंतरही मृत शरीराच्या विघटनामुळे शरीराचा भार पृथ्वीवर राहत नाही. याचाच अर्थ मानवाच्या अस्तित्वासाठी, कल्याणासाठी जैवविविधता महत्त्वाची आहे.

पृथ्वीच्या संतुलनासाठी प्रत्येक सजीव कळत-नकळत योग्य भूमिका बजावत असतो. मोठे सस्तन प्राणी, वाघ, सिंह, हत्ती, पक्षी गिधाडे, समुद्रातील व्हेल, डॉल्फिन मासे, निसर्ग संतुलनासाठी पूरक भूमिका बजावतात. एक वाघ अनेक एकर जंगलाचे रक्षण करतो. यासाठीच पर्यावरणातील प्रत्येक सजीव महत्त्वाचा आहे. प्राण्यांच्या अन्नसाखळीत भक्ष्य आणि भक्षक यातील एक जरी घटक नाहिसा झाला, तर उपासमारीची वेळ येते. पक्षी फळ, फुलझाडांवर उदरनिर्वाह करताना परागिभवन, बीजप्रसार होतो. झाडांच्या संवर्धनामुळे ऊन, वारा, पाऊस यांचे संतुलन राहते. जल, वायू, अन्न ही सारी चक्रे एकमेकांवर अवलंबून असतात. हेच जैवविविधतेचे महत्त्व. यातच एकमेकांची निकटता भागवताना पर्यावरणात बदल झाला, तर नैसर्गिक संतुलन बिघडते.

प्रदूषण, घातक रसायने, अतिरिक्त मासेमारी, चोरट्या शिकारी, प्राणी-पक्ष्यांच्या अधिवासावर अतिक्रमण यामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. पावसाळ्यात मासे अंडी घालत असल्याने अर्थात प्रजनन हंगाम असल्याने पूर्वी मासेमारी केली जात नसे. आता यांत्रिक बोटी वर्षभर मासेमारी करतात. प्रमाणाबाहेर होणारी प्राणी हत्या आणि त्यांच्या अधिवासांवरील अतिक्रमणांमुळे जैवविविधता नष्ट होत आहे.

वास्तविक पाहता जैवविविधतेच्या बाबतीत आपला भारत जगातील सर्वात समृद्ध देश मानला जातो. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे, आपल्याकडे प्राणी, पक्षी आणि झाडे आणि वनस्पतींच्या सर्वाधिक प्रजाती आहेत. जीवशास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, हरणांच्या आठ प्रजाती भारतात आढळतात. जगातील दुर्मिळ लहान उंदीर हरण (माऊस डिअर) केवळ भारतात आढळते. आफ्रिकन खंडात हरणांची एकही जात आढळत नाही. त्याचप्रमाणे, युरोप आणि उत्तर अमेरिकन खंडात सिंहाच्या प्रजाती आढळत नाहीत. त्याचप्रमाणे मानवजातीच्या सर्वाधिक निकट गोरिला, चिंपांझी, ओरंगउटान अणि गिब्बन या चार नैसर्गिक प्रजातींपैकी अंतिम गिब्बन हा फक्त भारतातील अरुणाचल प्रदेशातील जंगलात आढळतो. तज्ज्ञांच्या, हे सर्व जीव विषुववृत्त रेषेच्या सदाहरित जंगलातील आहेत आणि हवामानाच्या अनुकूलतेसह पृथ्वीवरील विविधता, लांब सागरी किनारे आणि समुद्रातील विविध बेटांमुळे भारतात पशू-पक्षी आणि वनस्पतींच्या विविध जातींचा विकास शक्य होऊ शकला.

पण; ज्याप्रकारे संपूर्ण विश्व आज जागतिक प्रदूषण आणि ग्लोबल वॉर्मिंगशी संघर्ष करीत आहे; अशा परिस्थितीत, जैवविविधतेचे संवर्धन व संरक्षण हे एक अतिशय गंभीर आव्हान आहे. 'नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स जर्नल' मध्ये प्रकाशित झालेल्या शोधप्रबंधात पृथ्वीवरील जैविक विनाशाबद्दल इशारा देण्यात आला आहे. या अभ्यासानुसार, सुमारे साडेचार अब्ज वर्ष जुन्या असलेल्या या आपल्या पृथ्वीने आतापर्यंत पाच 'महाविनाश' पाहिले आहेत आणि विनाशाच्या या अनुक्रमात, लाखो प्रजाती आणि वनस्पती नष्ट झाल्या. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार, पृथ्वीवर १६ लाख जीव-जंतू अर्थात प्राण्यांच्या प्रजातींचा शोध घेण्यात आला आहे. या संशोधनानुसार, पृथ्वीवर जे पाचवे महाविनाशाचे संकट कोसळले होते त्यात डायनासोरसारख्या महाकाय प्राण्यांचाही अंत झाला. या संशोधन पत्रिकेत हा देखील इशारा देण्यात आला आहे की पृथ्वीने आता सहाव्या महाविनाशमध्ये प्रवेश केला आहे आणि त्याचा अंत सर्वांत भयानक असेल. मागील पाच 'महाविनाश' तर नैसर्गिक होते, परंतु वर्तमानातील सहावा महाविनाश मानवनिर्मित असल्याने याची गती खूप जास्त आहे, असे वैज्ञानिकांचे मत आहे. या संशोधनातील निष्कर्षांवरून असे दिसून येते की गेल्या दोन शतकांमध्ये विविध जीव जंतूंच्या प्रजातींची संख्या खूप वेगाने नामशेष झाली आहे. शास्त्रज्ञांनी याला एक प्रकारची जागतिक महामारी असे संबोधले आहे. उपरोक्त सायन्स जर्नलच्या अहवालानुसार, नैसर्गिक अधिवास हिरावले गेल्यामुळे आज प्राणी, पक्षी आणि झाडे व विविध वनस्पतींच्या ४१ हजार ४१५ प्रजातींसमोर अस्तित्वाचेच संकट उभे ठाकले आहे. जर व्यक्तींचा लोभ, पराकोटीचा स्वार्थ व पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने ओरबाडून घेण्याच्या वृत्तीला आळा घातला नाही किंवा स्वार्थी विचारांवर नियंत्रण आणले

> विविध प्राणी-पक्षी, झाडे, वनस्पती, खळाळत वाहणाऱ्या नद्या, पर्वत ही आहे आमची रमणीय सृष्टी. वसुंधरा अर्थात पृथ्वीवरील ही निसर्ग संपदा आम्हाला जपायची असेल तर जैवविविधतेचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. वास्तविक पाहता जैवविविधतेच्या दृष्टीने भारत जगात अद्वितीय आहे. परंतु प्रदूषण, लोभ आणि वाढता चंगळवाद जीवसृष्टी व जैवविविधता जपण्यात अडथळा ठरत आहेत. वैदिक संस्कृतीत सांगितलेली शाश्वत जीवनमूल्येच यातून मार्ग काढू शकतील.

नाही तर केवळ जैवविविधता, वन्यजीव प्रजाती नष्ट होतील असे नसून संपूर्ण मानवी सभ्यता आणि संस्कृतीच नष्ट होण्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

एक काळ असा होता की वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे मनुष्य गुहेत आणि झाडांवर आश्रय घेत फिरत असे. परंतु जसजशी तो प्रगती करीत गेला तसतसे मनुष्येत्तर जीवजगताचा स्वामी होण्याची त्याची इच्छा वाढतच गेली. अनियोजित, अनियंत्रित औद्योगिक विकास आणि मनुष्याच्या संकुचित व स्वार्थी विचारांचा परिणाम म्हणजेच चित्ता, गिधाड यासारख्या प्राण्यांच्या विविध प्रजाती आणि वृक्ष-वनस्पती आज वेगाने नामशेष होत आहेत. जैवविविधतेचे संरक्षण-संवर्धन याचा अर्थ कोणत्याही राष्ट्राच्या भौगोलिक सीमेत आढळणारे प्राणी, पक्षी आणि वृक्ष-वनस्पतींना नामशेष होण्यापासून वाचवणे. आमच्या देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी गहन नाते सांगणारी आमची अनमोल अशी अफाट नैसर्गिक साधनसंपत्ती आज ग्राहक संस्कृतीच्या, चंगळवादाच्या बाजारात विकाऊ झाली आहे, ही अतिशय गंभीर चिंतेची बाब आहे. यामुळेच भौगोलिक भिन्नतेने परिपूर्ण असलेल्या प्रत्येक भागात वृक्ष, झाडे-झुडपांसह वन्य प्राणी आणि पक्ष्यांचे अधिवास (निवासस्थान) हिरावून घेण्यात येत आहेत. आमच्या भोळ्या भाबड्या वनवासी बांधवांना आमिष दाखवून भारतातील त्या क्षेत्रात घुसखोरी झाली आहे, जेथे दुर्मिळ औषधी वनस्पती, जडी-बुटी आणि मौल्यवान जीवाश्म आहेत. ज्यांचे जीवन पूर्णपणे नैसर्गिक चक्रावर, निसर्गावर अवलबूंन आहे तेच बाजारपेठेच्या, उपभोक्तावादाच्या दुष्टचक्रात अडकून या मौल्यवान संपत्तीच्या बेकायदेशीर तस्करीत सहाय्य करीत आहेत. वन्यजीव तज्ज्ञांनी ताज्या आकडेवारीच्या आधारे असा निष्कर्ष काढला आहे की गेल्या तीन शतकांमध्ये मानवांनी आपल्या स्वार्थ रक्षणासाठी सुमारे २०० प्राण्यांचे, जीव-जंतूंचे अस्तित्व नष्ट केले. सध्या भारतात सुमारे १४० प्रकारचे प्राणी-पक्षी संकटात आहेत. आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की १८ व्या शतकापर्यंत दर ५५ वर्षांनी एका वन्य प्राण्याची प्रजाती लुप्त होत होती तर १९ व्या व २० व्या शतकाच्या दरम्यान, दर १८ महिन्यांत एक वन्यजीवाची प्रजाती नष्ट होत गेली. कृषी क्षेत्राबद्दल बोलायचे झाल्यास गेल्या काही दशकांत आपल्या देशातील कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी रसायनांचा वापर इतका प्रचंड वाढला आहे की कृषी अवलंबित जैवविविधतेची मोठ्या प्रमाणात हानी झाली. आज, परिस्थिती इतकी वाईट झाली आहे की दिवसेंदिवस डझनभर कृषी प्रजाती नष्ट होत आहेत. हरित क्रांतीने आमच्या धान्याशी संबंधित गरजा तर पूर्ण केल्या. परंतु रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे शेतजमिनीचे आरोग्य खराब झाले आहे. परिणामी धान्याच्या असंख्य प्रजाती अकाली नष्ट झाल्या. एकेकाळी भारतात तांदळाचे ऐंशी हजार प्रकार होते, असे सांगितले जाते. परंतु आता त्यापैकी किती शिल्लक आहेत, त्याचे आकडे कृषी विभागाकडे नाहीत. एवढेच नव्हे तर आता पिकांची उत्पादकता वाढविण्याच्या नावाखाली होणारा जीएम बियाण्यांचा वापर देखील जैवविविधता नष्ट करण्याच्या प्रक्रियेला वेग देऊ शकतो.

जरा तो काळ आठवा जेव्हा नद्या आणि झऱ्यांचा मधुर आवाज दूरदूरपर्यंत ऐकू येत असे. परंतु आज हे सुमधुर ध्वनी, नाद वाहन, कारखान्यांच्या गोंगाटात पार दबून गेले आहेत. प्रदूषणाने उद्भवलेल्या बऱ्याच समस्यांमुळे वेढलेली व्यक्ती आज विव्हळत आहे. वरून निसर्ग चक्राची तीव्र अनियमितता आणि असंतुलन या आगीत तूप म्हणून काम करीत आहे. आकडेवारीवरून असे दिसून येते की दरवर्षी सुमारे ३३ दशलक्ष टन लाकूड इंधन म्हणून वापरले जाते. जरी केंद्रातील मोदी सरकारने उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून इंधनासाठी लाकडावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कौतुकास्पद प्रयत्न केले आहेत, परंतु तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जंगलांजवळील खेड्यांमध्ये इंधनाची समस्या दूर करण्यासाठी गोबर गॅस सयंत्र उभारण्यासाठी आणि प्रत्येक घरात वीज जोडणी प्रदान करण्याच्या दिशेने सक्रियता बाळगण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे सिक्कीम हे पूर्णपणे सेंद्रिय (जैविक) शेती करणारे देशातील पहिले राज्य बनले त्याप्रमाणे इतर राज्यांनी प्रेरणा घेऊन अधिकाधिक प्रमाणात सेंद्रिय शेती करणे आवश्यक आहे. शेत जमीन नापिक होऊ नये यासाठी गो आधारित नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला चालना देण्याची गरज आहे.

भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक व विचारवंत स्वामी विवेकानंद, महर्षी अरविंद आणि महात्मा गांधींपासून ते दीनदयाल उपाध्याय यांच्यापर्यंत सर्वांनाच असा विश्वास आहे की पर्यावरणीय संकटातून बाहेरचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य असलेला भारत हा एकमेव देश आहे. 'जगा आणि जगू द्या ' या तत्त्वावर आधारित वैदिक हिंदू तत्त्वज्ञान माणसाला पाणी, वन, जमीन आणि हवामानावर प्रेम करण्यास शिकवते. जगातील या सर्वांत वैज्ञानिक आणि सर्वसमावेशक धर्माच्या श्रद्धा आणि परंपरा निसर्गाच्या विविध घटकांच्या संरक्षण व संवर्धनासाठी पोषक आहेत. यात जैवविविधतेच्या संवर्धनाची अनेक सूत्रे आहेत. यजुर्वेदातील शांतिपाठातील ''ॐ द्यौः शान्तिरन्तरिक्षं शान्तिः पृथिवी शान्तिरापः शान्तिरोषधयः शान्तिः वनस्पतयः शान्तिविर्श्वे देवाः शान्तिर्ब्रह्म शान्तिः सर्वं शान्तिः शान्तिरेव शान्तिः सा मा शान्तिरेधि ॐ शांतिः शांतिः शांतिः॥'' या मंत्रात वैदिक ऋषी ज्याप्रमाणे समष्टीच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात, असे उदाहरण जगातील कोणत्याही धर्म व संस्कृतीत आढळत नाही. देवधिदेव महादेवांना, भगवान शिवशंकरांना हिमालयातील संपूर्ण जैवविविधतेचे संरक्षक मानले जाते. ते आपल्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वातून जैवविविधतेच्या संरक्षणाची शिकवण देतात. आज समाजात या धार्मिक श्रद्धा, आस्था, परंपरा आणि मान्यता योग्य रीत्या दर्शविण्याची गरज आहे, जेणेकरून आमच्या समाजाला जैवविविधतेचे महत्त्व समजेल आणि समाज त्याच्या संरक्षणास हातभार लावेल. जर आपणास या पृथ्वीमातेला, भूमातेला, वसुंधरेला संरक्षित व सुरक्षित ठेवायचे असेल तर आमच्या वैदिक संस्कृतीच्या सूत्रांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल.

*(पांचजन्यवरून साभार)*

## विविध

**डेन्मार्कमध्ये सार्वजनिक ठिकाणी बुरखा-हिजाब किंवा नकाब घातला तर दंड आकारला जातो. परंतु ही बंदी अद्याप शैक्षणिक संस्थांना लागू नव्हती. मात्र, डेन्मार्क सरकार शैक्षणिक परिसरातही बुरखा/हिजाब बंदी लागू करण्याच्या दृष्टीने पावले उचलत आहे. डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनी तसे स्पष्ट संकेत दिले आहेत.**

# बुरखा-हिजाबवर डेन्मार्कमध्ये येणार बंदी



डेन्मार्कमधील शाळा आणि विद्यापीठांमध्ये मुस्लिम महिला परिधान करीत असलेल्या बुरख्यावर बंदी घालायला हवी, असे उद्गार खुद्द पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनी एका कार्यक्रमात काढले. शिक्षण क्षेत्रातील धार्मिक प्रतीकांची व्याप्ती मर्यादित करण्याच्या उद्देशाने त्यांनी हे विधान केल्याचे सांगितले जाते. सार्वजनिक ठिकाणी डोक्यापासून खालपर्यंत संपूर्ण शरीर झाकले जाईल, असे कोणत्याही प्रकारचे कपडे डेन्मार्कमध्ये परिधान करता येत नाहीत. डेन्मार्कमध्ये २०१८ मध्येच सार्वजनिक ठिकाणी बुरखा/हिजाब आणि नकाबवर बंदी घालण्यात आली आहे. परंतु ही बंदी अद्याप शैक्षणिक संस्थांना लागू झालेली नाही.

डेन्मार्कमध्ये सार्वजनिक ठिकाणी बुरखा किंवा नकाब घातला गेला तर दंड देखील आकारला जातो. तथापि, अनेक मानवाधिकार संघटनांनी याला विरोध केला आहे, अशा प्रकारचे प्रतिबंध म्हणजे धार्मिक स्वातंत्र्य आणि महिलांच्या वस्त्र प्रावरणे परिधान करण्याच्या स्वातंत्र्यावर आघात असल्याचे या संघटनांचे म्हणणे आहे.

२०१८ मध्ये ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने म्हटले होते की जो पोषाख परिधान करून आनंद व समाधान प्राप्त होते आणि ज्या पोषाखामुळे त्यांची अस्मिता, ओळख किंवा श्रद्धा व्यक्त होते, असा पोषाख सर्व महिलांनी परिधान केला पाहिजे. परंतु डेन्मार्कच्या पंतप्रधान, ज्या स्वतः एक महिला आहेत, त्या म्हणतात की महिलांना पडद्यात, बुरख्यात ठेवणे हे महिलांचे शोषण करण्याव्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. 'कायद्यात काही त्रुटी आहेत, ज्यामुळे डेन्मार्कमधील मुस्लिम सामाजिक रीत्या महिलांवर नियंत्रण ठेवतात आणि त्यांचा छळ करतात, असेही पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनी रोखठोकपणे सांगितले.

'तुम्हाला तुमच्या धार्मिक श्रद्धा पाळण्याचा आणि तुमच्या धर्माचे आचरण करण्याचा पूर्ण अधिकार आहे, परंतु लोकशाही सर्वोच्च आहे, असे माध्यमांशी बोलताना पंतप्रधानांनी स्पष्ट केले.

डेन्मार्कमध्ये पूर्ण चेहरा झाकणारी कुठलीही वस्त्र घालण्यावर बंदी घालण्यात आली आहे. हा नियम न पाळणाऱ्या कुठल्याही व्यक्तीला १,००० क्रोनर (म्हणजे साधारण १०,५०० रुपये) दंड ठोठावण्यात येतो. १ ऑगस्ट २०१८ पासून हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्यानुसार सार्वजनिक स्थानी कुणालाही नकाब आणि बुरखा वापरता येत नाही. मात्र, शैक्षणिक संस्थांमध्ये, परिसरात ही बंदी लागू करण्यात आली नव्हती.

या कायद्याबद्दल बोलताना डेन्मार्कचे तत्कालीन कायदा मंत्री सोरेन पापे पॉसलन म्हणाले होते, 'आपल्या समाजात वेळोवेळी चर्चा होत असते की आपल्याला कसा समाज हवा आहे, आपला समाज कसा आहे. चेहरा झाकणं, डोळे झाकणं आपल्या संस्कृतीचा भाग नाही. आपल्याला एकमेकांना सहज बघता, ओळखता आलं पाहिजे. ही डेन्मार्कची स्वतःची मूल्यं आहेत.'

गेल्या काही वर्षांपासून, डेन्मार्कमध्ये प्राथमिक शाळांमध्ये हिजाब घालण्यावर बंदी घालण्याची मोहीम सुरू आहे. कमिशन फॉर फॉरगॉटन वुमेन्स स्ट्रगल नावाची एक संस्था ही मोहीम सातत्याने राबवत आहे. २०२२ मध्ये, याच सरकार समर्थित संघटनेने प्राथमिक शाळांमध्ये 'अल्पसंख्याक महिलांनाही आपल्या डॅनिश मुली आणि महिलांसारखेच अधिकार मिळावेत' हे सुनिश्चित करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली होती. पण त्यावेळी ही मागणी मान्य करण्यात आली नाही. कारण त्याविरुद्ध मोठेच आंदोलन, निदर्शने झाली आणि २०२३ मध्ये ही योजना रद्द करण्यात आली. युरोपमध्ये मुस्लिमांना पाश्चिमात्यांशी सुसंगत बनवण्यासाठी अशी पावले उचलण्याची शिफारस सतत केली जात आहे, हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. परंतु, डेन्मार्कमध्ये एक मोठा असाही वर्ग आहे जो ओळख, अस्मिता जपण्याच्या नावाखाली फुटीरतावादाची, कट्टरवादाची बीजे पेरतो आणि अस्मितेच्या लढाईच्या नावाखाली सर्वकाही करतो, जे त्यांनी करायला नको.

तथापि, डेन्मार्कच्या पंतप्रधानांनी केवळ शैक्षणिक संस्थांमध्ये बुरखा, हिजाब किंवा नकाबवरील बंदीबद्दल भाष्य केले नाही तर शैक्षणिक संस्थांमध्ये नमाज पढण्यासाठी बनवलेल्या खास खोल्या देखील काढून टाकाव्यात अशी आपली इच्छा असल्याचेही त्यांनी सांगितले. त्या म्हणाल्या की अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये अशाप्रकारच्या खोल्या बांधल्या जातात. या खोल्या समावेशाची भावना निर्माण करत नाहीत, तर भेदभाव आणि दबावासाठी सुपीक जमीन तयार करीत आहेत, असे रोखठोक मत पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनी व्यक्त केले. शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक प्रथांसाठी जागा असणे हेच अतिशय धक्कादायक व आश्चर्यकारक आहे, असेही त्यांनी सांगितले. आपण यावर तात्काळ बंदी घालण्याची मागणी करत नाही. परंतु शिक्षण मंत्री मट्टीयस टेस्फे आणि उच्चशिक्षण मंत्री क्रिस्टीना शाळा आणि विद्यापीठ प्रशासनाशी चर्चा करतील, संवाद साधतील आणि शैक्षणिक परिसरातील खोल्या नमाज पठण करण्यासाठी नाहीत, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतील, असे पंतप्रधानांनी सांगितले. देश धार्मिक संवादांवर चालू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्टपणे बजावले. डेन्मार्क एकेकाळी निर्वासितांच्या समस्येशी झुंजत होता. मात्र, तो सध्या बेकायदेशीर निर्वासितांची संख्या कमी करणारा देश म्हणून उदयास आला आहे. निर्वासितांच्या वस्त्या कमी झाल्या आहेत. मात्र, कट्टरवादी तसेच फुटीरवादी मुस्लिमांच्या कारवायांना आळा घालणे हे या देशासमोरचे मोठे आव्हान आहे.

> बुरखा, नकाबसारख्या पोशाखांवर बंदी घालणारा डेन्मार्क हा काही पहिलाच देश नाही. एप्रिल २०११ मध्ये फ्रान्सने युरोपात सर्वप्रथम अशी बंदी घातली. त्यानंतर बेल्जियमनेही असे कपडे घालण्यावर बंधने आणली, ज्यामुळे सार्वजनिक ठिकाणी कुण्या व्यक्तीची ओळख कळणार नाही. शिवाय, ऑस्ट्रिया, बल्गेरिया आणि दक्षिण जर्मनीतल्या बव्हेरिया राज्यात अशीच बंदी आहे. नेदरलँड्सच्या संसदेनेही २०१६ साली या संदर्भातला एक प्रस्ताव मंजूर केला होता, पण त्याला अजून कायदेशीर रीत्या मान्यता मिळालेली नाही.

**(पांचजन्यवरून साभार)**

# नक्षलवाद : शवपेटीवरील अंतिम खिळा...

(पान १ वरुन)

### शहरी नक्षलवाद्यांचा धोका

विचारधारेच्या या लढाईत अंतिम विजय तेव्हाच मिळू शकतो जेव्हा नक्षलवाद्यांना दिला जाणारा सक्रिय पाठिंबा आणि वित्तपोषण पूर्णपणे बंद केले जाईल. लक्षात ठेवा, जेव्हा सुरक्षा दल कर्रेगुट्टाच्या टेकडीवर नक्षलवाद्यांशी प्रखरपणे लढत होते, त्याच वेळी तेलंगणात विरोधी पक्ष बीआरएसचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री चंद्रशेखर राव नक्षलवाद्यांशी शांती चर्चेची मागणी करत होते. सध्या तेलंगणात अनेक नक्षलवादी गट सक्रिय आहेत, ज्यांनी सिव्हिल सोसायटीचा मुखवटा चेहऱ्यावर चढवला आहे. दुसरीकडे, छत्तीसगड आहे, जिथे सरकार वामपंथी विचारसरणीच्या माओवाद्यांना सणसणीत प्रत्युत्तर देत आहे. या क्रमाने, सप्टेंबर २०२४ रोजी, बस्तरमधील ५५ नक्षलग्रस्त दिल्लीत दाखल झाले आणि जंतरमंतरवर आपली व्यथा देशासमोर मांडली. त्याच दिवशी संध्याकाळी, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये आयोजित कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना आपली दुर्दशा सांगितली. हे नक्षल पीडित म्हणाले की अभ्यासू आणि विचारशील लोकांनी समस्या ओळखली पाहिजे आणि त्यांनी कोणत्याही विचारसरणी किंवा अजेंड्याच्या प्रभावाखाली येऊ नये. ''ज्या जल, जंगल आणि जमीन' या घोषणेअंतर्गत नक्षलवादाला न्याय्य ठरविले जाते, त्याच नक्षलवादामुळे आज आम्ही आमच्याच जंगलात जायला घाबरतो. कधी, कोणत्या झाडाखाली आयईडी किंवा प्रेशर बॉम्बचा स्फोट होईल आणि आपल्याला प्राण गमवावे लागतील याची टांगती तलवार सतत डोक्यावर असते' अशा शब्दात या नक्षलपीडित लोकांनी आपली व्यथा मांडली. नक्षलवादी शाळा उद्ध्वस्त करून आमच्या पिढीला कसे निरक्षर बनवू इच्छित होते आणि रस्ते व दळणवळणाची साधने नष्ट करून आम्हाला जगापासून कसे तोडू इच्छित होते, हे देखील या नक्षलपीडित लोकांनी देशवासीयांना सांगितले. जे नक्षलपीडित चालण्या फिरण्याच्या स्थितीतही नव्हते त्यांनी जेएनयूच्या विद्यार्थ्यांना विचारले की हे तथाकथित विचारवंत, बुद्धिजीवी, मानवतावादी बस्तरच्या जंगलात तथाकथित जनअदालत स्थापन करून नक्षलवाद्यांनी केलेल्या अन्यायाबद्दल त्यांना जाब का विचारत नाहीत. नक्षलवादाने देशाला, विशेषतः छत्तीसगडच्या बस्तर क्षेत्राला मृतदेहांशिवाय काहीही दिले नाही. आज, जेव्हा नक्षलवादी चळवळ शेवटच्या घटका मोजत आहे, तेव्हा या भळभळत्या जखमेचा एक अंशही शिल्लक राहणार नाही, हे सुनिश्चित केले पाहिजे. सामाजिक कार्य किंवा मानवाधिकारांचे कवच परिधान केलेल्या अनेक नक्षल समर्थक संघटना नक्षलवाद जिवंत ठेवण्यासाठी सरकारवर चर्चेसाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. यासाठी नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली असलेल्या ग्रामस्थांचीही मदत घेतली जात आहे, जेणेकरून स्थानिक लोक नक्षलवाद्यांच्या बाजूने उभे आहेत असा आभास निर्माण होईल. अर्बन नक्षलवाद्यांचे हे नॅरेटिव्ह समजून घेतले पाहिजे. वामपंथी विचारसरणीच्या कार्यकर्त्या सीमा आझाद यांनी ब्लॉगमध्ये लिहिले आहे की, 'गेल्या दोन महिन्यांपासून माओवादी शस्त्रे टाकून सरकारला शांती चर्चेचे आवाहन करत आहेत. अनेक मानवाधिकार संघटना आणि बुद्धिजीवी सरकारला शांती चर्चेचे आवाहन करत आहेत. अशा वेळीही त्यांच्याशी चर्चा-बोलणी न करता त्यांना मारत सुटणे न्यायालयाबाहेरील हत्या आणि मानवाधिकारांचे उल्लंघन मानले जाईल.''

प्रश्न असा आहे की, सरकार नक्षलवाद्यांशी चर्चा- बोलणी करण्यास केव्हा तयार नव्हते? छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री विजय शर्मा यांनी जुलै २०२४ मध्ये म्हटले होते की सरकार नक्षलवाद्यांशी बोलण्यास तयार आहे. राज्य सरकार व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा करण्यासही तयार होते. तेव्हा नक्षलवादी आणि अर्बन नक्षलवादी गप्प का होते? वस्तुस्थिती ही आहे की ते त्यावेळी चर्चेसाठी यासाठी पुढे आले नाहीत कारण ते स्वतःला अजिंक्य, अजेय मानत होते. ते असे गृहित धरत होते की सुरक्षा दलांनी काहीही केले तरी ते त्यांच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच 'अबुझमाड' पर्यंत पोहोचू शकत नाहीत. आता नक्षलवादी संघटना पार विखुरल्या आहेत. तेव्हा त्यांच्याशी चर्चा करणे म्हणजे नक्षलवाद्यांना पुन्हा उभे राहण्याची संधी देणे होय.



### बसवाचे एलटीटीईशी संबंध

जहाल नक्षलवादी बसवा राजू लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम (एलटीटीई) मध्ये सामील झाला आणि त्याने इम्प्रोवाईज्ड एक्स्प्लोझिव्ह डिव्हाईस (आयईडी) चे प्रशिक्षण घेतले. दोन दहशतवादी संघटनांच्या मिलनामुळे नक्षलवाद अतिशय क्रूर आणि भयानक स्वरूपात उदयास आला. बसवा राजूने रानीबोडली (२००७), एर्राबोर (२००७), मदनवाडा (२००९), ताडमेटला (२०१०), गादिरास (२०१०), धौडई (२०१०), झीरम (२०१३), चिंतागुफा (२०१७), किस्टरम (२०१८), श्यामगिरी (२०१९), मिनपा (२०२०), टेकुलगुडेम (२०२१) अशा अनेक नक्षलवादी हल्ल्यांमध्ये निष्पाप ग्रामस्थ आणि सैनिकांच्या रक्ताने बस्तरची माती लाल केली होती. २०१८ मध्ये, जेव्हा संघटनेचा सरचिटणीस गणपती याने वाढत्या वयामुळे पद सोडले, तेव्हापासून बसवा राजूच संघटना सांभाळत होता. नक्षलवादी संघटनेत सरचिटणीस हे सर्वोच्च पद आहे. बसवा राजू हा दहशतवादी रणनीती बनविण्यात तज्ज्ञ होता. संघटनेचा सरचिटणीस राहिलेले कोंडापल्ली सीतारामय्या, गणपती आणि बसवा राजू यांनी चार दशके बस्तर विभागात दहशत माजवली. परंतु बसवा राजू याच्या मृत्युनंतर माओवादाची दशा-दिशा काय असेल हे पाहावे लागेल. परंतु संघटना अतिशय दुर्बळ झाली आहे हे निश्चित आहे. केंद्र आणि राज्याच्या संयुक्त राजकीय इच्छाशक्तीने ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद्यांचा पूर्णपणे नायनाट करण्याचा निर्णय घेतला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. बसवा राजू याच्या मृत्यूनंतर अशक्य वाटणारे ध्येय आता पूर्ण होण्याच्या जवळ आले आहे.

**(पांचजन्यवरून साभार)**

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

दिनेश गुणे

# आले महाराष्ट्राच्या मना...

आपल्या मनाला वाटेल त्या रीतीने मतदारांचे मन वाकविता किंवा वळविता येईल ही काही राजकीय पक्षांची मानसिकता अजूनही बदललेली नाही. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात अनाकलनीय आणि काहीशा अनपेक्षितही उलथापालथी झाल्या. बाळासाहेब ठाकरे यांच्या पश्चात शिवसेना हा लहान भाऊ असेल आणि भारतीय जनता पक्ष हा मोठा पक्ष असेल असे भाकीत भाजपचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांनी केले, तेव्हा त्याची राज्यात कुजबुजती चर्चा झाली होती. दोन्ही पक्षांच्या राजकीय अपरिहार्यतेपोटी युतीच्या धाग्याने परस्परांसोबत राहण्यासाठी दोन्ही पक्षांची धडपड सातत्याने सुरू असताना प्रमोद महाजन यांनी वर्तविलेले हे भाकीत म्हणजे, भविष्यातील भाजपचे स्वबळाच्या वाटचालीचे स्पष्ट संकेत असल्यामुळे, युतीचा धागा केव्हाही सोडून दिला जाईल, असेही तेव्हा बोलले जात होते. पुढे तसे झाले, याचे मुख्यतः कारण बाळासाहेबांच्या पश्चात शिवसेना पक्षाच्या प्रमुखपदाची माळ गळ्यात घेतलेल्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीत दडलेले होते, हे आता मागे वळून पाहताना स्पष्ट होते. ठाकरे यांच्या नेतृत्वावर नाराजी आणि नापसंती व्यक्त करतच या पक्षातील बडे नेते पक्षाला 'जय महाराष्ट्र' करून वेगळ्या चुली मांडत किंवा शोधत होते, तेव्हा पक्षाच्या भविष्यातील संभाव्य हानीचे गांभीर्य उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वास उमगले नसावे. म्हणूनच, पक्षाबाहेर जाणाऱ्यांबाबतची बाळासाहेबांच्या काळातील शिवसेनेची भूमिका उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाच्या काळात एकशे ऐंशी अंशातून वळली. 'या चिमण्यांनो, परत फिरा, घराकडे' अशी साद घालून पक्षत्याग करणाऱ्या मोहऱ्यांना भावनिकदृष्ट्या माघारी आणण्याचे प्रयत्न बाळासाहेबांच्या काळात झाले होते, तर 'उडाले ते कावळे' अशा शब्दांत संभावना करत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे काही नेते पक्षाबाहेर जाणाऱ्यांची वजाबाकी करत होते. त्यातूनच शिवसेनेची शकले तर उडालीच, पण महाराष्ट्राच्या सत्ताकारणात अपरिहार्यपणे निर्माण झालेल्या युती आणि आघाडीच्या राजकारणातून नगण्य स्थितीपर्यंत पोहोचण्याची वेळही त्यांच्या गटावर आली आहे.

बाळासाहेबांकडे शिवसेनेचे एकहाती नेतृत्व असताना आणि भाजपसोबत युती असतानाही, युतीच्या कारभाराचा रिमोट आपल्या हाती ठेवण्याच्या बाळासाहेबांच्या आग्रहास तेव्हा भाजपच्या नेतृत्वाने कदाचित नाईलाजाने का होईना संमती दिलेली होती. त्यामुळेच, बाळासाहेबांची नाराजी ओढवणार असे वाटताच भाजपचे दिग्गज नेते मातोश्रीचे उंबरठे झिजवून बाळासाहेबांची समजूत काढत युतीचे तारू तग धरून राहील याची काळजी घेत असत. १९९२ मध्ये या दोन पक्षांत युती झाली नाही आणि त्याचा फटका दोन्ही पक्षांना बसला. तेव्हा झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत युती नसल्याने काँग्रेसला त्याचा स्पष्ट फायदा झाला व काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे महापौर झाल्याने युतीचे बिघडलेले गणित बाळासाहेब ठाकरे व प्रमोद महाजन या दोन्ही नेत्यांनी गांभीर्याने मान्य केले. ते गणित पुन्हा जुळवायचे असेल तर पुन्हा एकत्र येण्याखेरीज पर्याय नाही या वास्तवाची जाणीव दोघांनाही झाली व पुन्हा युतीचा प्रस्ताव घेऊन महाजन यांनी बाळासाहेबांची मनधरणी केली. ४ फेब्रुवारी १९९२ ही तारीख त्या घडामोडींच्या दृष्टीने ऐतिहासिक होती. या दिवशी, प्रमोद महाजन आणि बाळासाहेब ठाकरे यांनी प्रसार माध्यमांमार्फत एक संयुक्त पत्रक जारी केले आणि यापुढे युतीची बेरीज दिसेल, वजाबाकी नाही अशी ग्वाही देत पुन्हा एकदा हातमिळवणी केली. मुंबई महापालिकेच्या त्या निवडणुकीत काँग्रेसला ११२ जागांवर विजय मिळाला होता, तर शिवसेनेस ६९ आणि भारतीय जनता पार्टीला केवळ १४ जागांवर विजय मिळाला होता. महापालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याची राजकीय समीकरणे वेगळी असतात, लोकसभा-विधानसभेच्या मतांची गणिते तेथे तंतोतंत लागू पडत नाहीत, हे लक्षात घेऊन नव्या युतीची नवी वाटचाल सुरू झाली.

जे लोकसभेला झाले, जे विधानसभेच्या निवडणुकीतही दिसले, ते दुर्दैवाने महापालिकेच्या निवडणुकीत होऊ शकले नाही. याचा अर्थ, युती तुटली, युती फुटली, पण आम्ही कायमचे दुरावलो असा नाही. विभागांची फेररचना झाल्याने आणि काँग्रेसने ती मोठ्या डावपेचातून केल्याने काही त्रांगडी निर्माण झाली, असे स्पष्ट करत या निवेदनाद्वारे ठाकरे-महाजन यांनी दुरुस्तीचे पाऊल टाकले होते. त्याच काळात शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांत एकेका जागेसाठी अनेकजण दावा करू लागल्याने वाटाघाटी बिनसत असल्याचे लक्षात आले होते. त्यामुळे भविष्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्रच लढणार आहोत, एकत्रच बसणार आहोत, आणि युतीची बेरीजच दिसेल, असेही या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले गेले होते. भाजप आणि शिवसेनेच्या शाखांनी महाराष्ट्रात जेथे जेथे शक्य आहे, तेथे युती मोडण्यापेक्षा युती जोडण्यावर भर द्यावा आणि मैत्रीपूर्ण लढती या भंपक शब्दावर विश्वास न ठेवता एकत्र काम करावे, असा आदेशही उभय नेत्यांनी राज्यातील कार्यकर्त्यांना दिला होता. शिवसेना आणि भाजपची युती ही वैचारिक बैठकीवर आधारलेली व हिंदुत्वाच्या व्यापक हिताचा विचार करून निर्माण झालेली असल्याने आम्ही पुन्हा एकत्र येत आहोत, असा निर्वाळाही या नेत्यांनी एका निवेदनाद्वारे दिला होता.

महाजन आणि ठाकरे यांच्या या संयुक्त निवेदनाचा काळ आता बराच मागे पडला आहे. जवळपास तीन दशकांहूनही अधिक काळाच्या प्रवाहात गेल्या सुमारे दशकभरापासून या दोन्ही पक्षांतील कडवटपणा शिगेला पोहोचल्याचे महाराष्ट्राने



पाहिले आहे. ज्यांच्या मुखी परस्परांच्या गुणांची स्तोत्रे असत, त्याच मुखांतून परस्परांवर टीकेची झोड उठविणे सुरू झाले. भाजपच्या नेत्यांना अफझलखानाची औलाद ठरविण्यापर्यंत शिवसेनेच्या नेत्यांनी मतभेदाचे टोकदार दर्शन घडविले आणि युतीचा कटोरा कायमचा फेकून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने भाजपकडे कायमची पाठ फिरवली.

त्यानंतरचा ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गटाच्या वाटचालीचा इतिहास महाराष्ट्राने पाहिला आहे. गळती लागल्यामुळे, बंडखोरीमुळे आणि सत्तेच्या सावलीस कायमचे दुरावल्याचे स्पष्ट झाल्याने ठाकरे यांचा गट विकलांग झाला आहे आणि बाळासाहेबांच्या नेतृत्वाखालील पक्षाने दाखविलेली, चुकीची दुरुस्ती करण्याची राजनीतीदेखील या पक्षाच्या हातून निसटली आहे. साहजिकच, एका बाजूला बेरजेच्या राजकारणाचे भाजपचे जुने सूत्र जोमदारपणे अवलंबिले जात असताना, शिवसेनेच्या ठाकरे गटाला मात्र वजाबाकीच्या ग्रहणाने ग्रासलेले दिसत आहे. ही बाब आता पुन्हा एकदा महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आल्याने लक्षात आले म्हणूनच, उरल्यासुरल्या आकड्यांतून नव्या बेरजेची गणिते मांडणे ठाकरे गटाकरिता गरजेचे ठरले आहे. येत्या काळात या बेरजेची गणिते कितपत जमतील, त्याबाबत शंका आहेच, पण एकटे पडलेल्या ठाकरे गटासमोर आता दुसरा कोणताच मार्ग नाही, हेही स्पष्ट झाले आहे. २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या गळतीची पहिली प्रचीती आली. या निवडणुकीत शिवसेनेला ८४ तर भाजपला ८२ जागांवर विजय मिळाला. अनेक जागांवर पराभव होऊनही, भाजपहून जास्त जागा मिळाल्याबद्दल शिवसेनेच्या प्रथेप्रमाणे मातोश्रीसमोर शिवसैनिकांचा जल्लोष झाला, पण सत्तासंपादनासाठीच्या चिंतेनेही मातोश्रीवर खलबते सुरू झाली होती. महापालिकेतील सत्ता टिकवून ठेवण्यासाठी व महापौरपदावरील दावा टिकविण्यासाठी अपक्षांसोबत चर्चा सुरू झाल्याचे सांगण्यात येत होते, मात्र, भाजपसोबत युती करण्याचा कोणताही विचार नाही, असा दावा तत्कालीन नेते मनोहर जोशी यांनी केला होता.

उभय पक्षांतील या घडलंय-बिघडलंय नाट्याचे सर्व अंक आता समाप्त झाले आहेत. महापालिकेच्या आगामी निवडणुकीत ठाकरे गटाच्या अस्तित्वाची पुरती कसोटी लागणार हे स्पष्ट झाले आहे. शिवसेनेत फूट पाडून एकनाथ शिंदे यांनी भाजपचे बोट धरले, तेव्हा उद्धव ठाकरे यांनी जनतेच्या न्यायालयात दाद मागितली होती. निवडणूक आयोग किंवा न्यायालयापेक्षा, जनतेच्या मताधारातूनच खरी शिवसेना कोणाची हे स्पष्ट होईल, असे ते वारंवार म्हणत होते. कदाचित, मतदारांच्या मनात जे काही आहे, ते आपल्यालाच कौल देणारे असेल असा त्यांचा विश्वास होता. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी आपल्या मनातील बात उघड केली. ठाकरे गटास स्पष्टपणे नाकारले. महाविकास आघाडी म्हणून तीन पक्षांनी एकत्रितपणे निवडणूक लढवूनही, भाजपच्या पारड्यात जनाधाराचा स्पष्ट कौल पडला, तेव्हाच मतदारांच्या मनात काय आहे हे ठाकरे यांनी ओळखलेही होते. कार्यकर्त्यांनी नाकारले तर आपण पदावरून पायउतार होऊ, असे ते पक्षफुटीनंतर वारंवार सांगत असत. मात्र, निवडणुकीत जनतेने नाकारल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही, जनतेच्या मनात अजूनही आपले स्थान अढळ असल्याचा आव आणत ते भावी निवडणुकांची रणनीती आखत आहेत. एका अस्तित्वाच्या अपरिहार्यतेपोटी एकत्र येण्याच्या काही प्रयत्नांस, जनतेच्या भावनांचा बेगडी मुलामा देत ठाकरे ब्रॅण्ड या नावाचे पितळ उजळण्याचा नवा प्रयत्न सुरू झाला आहे. उद्धव ठाकरे यांचा गट आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोहोंनाही, जनतेने, मतपेटीतून सातत्याने नाकारले आहे. युतीच्या कुबड्या नसतील तर स्वबळावर सत्ता स्थापणे शक्य नाही याची जी जाणीव बाळासाहेबांना होती, ती उद्धव ठाकरेंना नसेल असे नाही. पण भाजपसोबतचे दोर स्वहस्ते कापल्याने नव्या कुबड्यांच्या आधाराच्या अपरिहार्यतेपोटी ठाकरे बंधूंच्या ऐक्याच्या चर्चा सुरू करण्यात आल्या आहेत, हे स्पष्ट आहे. महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव ठाकरे गट आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता एकत्र यावे ही महाराष्ट्राची इच्छा आहे, असा मुलामा या चर्चेस दिला जात आहे आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी, दोन्ही पक्षांचे एकत्र येणे महाराष्ट्रासाठी गरजेचे असल्याचा आभासही उभा केला जात आहे. प्रत्यक्षात, महाराष्ट्राच्या जनतेस या दोन्ही पक्षांचे स्वतंत्र असणे किंवा एकत्र येणे याबाबत काहीच देणेघेणे नाही आणि त्यांच्या कोणत्याही स्थितीबाबत काहीही भावनादेखील नाहीत हे मतपेटीतूनच महाराष्ट्राने दाखवून दिले असतानाही, ठाकरे बंधूंच्या ऐक्यासाठी उभा महाराष्ट्र उत्सुक असल्याची आवई उठविण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या मनात असेल तेच होईल असे काहीसे सूचक विधान करून उद्धव ठाकरे यांनी ऐक्याचे अनुकूल संकेत दिले, अशी चर्चा सुरू झाली आहे. पण महाराष्ट्राचे मन मागच्या निवडणुकांतच स्पष्ट झाले आहे. अन्यथा, २०१७ च्या निवडणुकीत भाजपच्याच बाहेरून पाठिंब्यावर मुंबई महापालिकेत सत्ता टिकविण्याचा नाईलाजाचा मार्ग ठाकरे यांना मान्य करावा लागलाच नसता. मतदारांच्या मनात काय आहे, हे ठाकरे यांना ठावूक आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनीही मनसेला मतदारांनी दिलेला कौल मान्य केलेला आहे. अशा स्थितीत, महाराष्ट्राला जे हवे तेच होईल असे सांगत नाहक मतदारांना मनास येईल तसे वळविण्याचा विश्वास दाखविणे हे मोठे धाडस ठरेल. ठाकरे बंधूंच्या ऐक्याच्या वावड्यांना दिवसागणिक नवनवी वळणे मिळत आहेत. मुळात, एकत्र येण्याबाबत या दोघा बंधूंच्या मनात काय आहे, याचा एकमेकांसही अजून थांग लागलेला नाही. राज ठाकरे यांनी गेल्या एप्रिलमध्ये महेश मांजरेकर यांच्या युट्यूबवरील मुलाखतीत ऐक्याच्या अनुकूलतेचे अंधुकसे संकेत दिल्यानंतर महापालिकेच्या निवडणुकीतील गरजेची तीव्रता लक्षात आली आणि ऐक्याच्या चर्चांना वाट करून दिली गेली. तेव्हापासून काही नेते युतीचे संकेत देतात तर काही नेते शक्यतांवर पाणी फेरणारी विधाने करतात, असेच चित्र वारंवार दिसत आहे.

युतीच्या चर्चा सुरू असतानाच राज ठाकरे यांनी अलिकडेच मुंबईत ताज लॅण्डसएण्ड हॉटेलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत तासभर चर्चा केली आणि ऐक्याच्या चर्चेला नवे वळण मिळाले. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने त्यांच्या पक्षांची ताकद किती वाढेल, सत्ता संपादनाचे बळ दोघांच्या ऐक्यातून मिळेल किंवा नाही, याची उत्तरे फारशी अवघड नाहीत. पण दोघे एकत्र न येण्याने भाजपच्या तंबूची ताकद मात्र अबाधित राहील असे एक गणित स्पष्टपणे दिसते. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत हातमिळवणी केली, तर त्यांना सत्ता मिळण्याची शक्यता नाही, याउलट, उद्धव ठाकरे यांच्यासोबत न राहता, स्वतंत्र राहून निवडणुका लढविल्या तर त्याचा थेट फायदा मात्र भाजप महायुतीस मिळेल, हे भाकीत वर्तविण्यासाठी कोणा राजकीय पंडिताची गरजच नाही. जिंकणाऱ्या घोड्यावरच पैज लावण्याएवढी समज राज ठाकरे यांच्याकडे आहे, असे त्यांना ओळखणाऱ्या अनेकांना खात्रीपूर्वक वाटते. तसेही, उद्धव ठाकरे यांच्या गटाकडे जिंकण्याची क्षमता आणि शक्यताही अजमावत महाविकास आघाडीदेखील अजूनही सावध पावलेच टाकत आहे. महाराष्ट्राच्या मनात काय आहे ते ओळखणे दूरच, पण ज्यांचे बोट धरून २०१९ मध्ये महाराष्ट्राची सत्ता हस्तगत केली, त्या शरद पवार यांच्या मनात काय आहे, तेदेखील ओळखणे उद्धव ठाकरे यांना अवघडच ठरत आहे. तसेही, पवार यांना ओळखण्यासाठी शंभर जन्म घ्यावे लागतील असे संजय राऊत यांनीच म्हटलेदेखील आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### कामठी-मौदा मतदारसंघाबाबत कॉंग्रेसचा दृष्टिदोष!

कामठी-मौदा विधानसभा मतदारसंघात ऐनवेळी मतदारांची संख्या कशी वाढली, असा संभ्रम निर्माण करीत कॉंग्रेसने आपल्यातील दृष्टिदोष दाखवून दिला आहे. मतदारसंघात वाढलेले मतदार आणि प्रत्यक्ष स्थितीचाही अभ्यास स्थानिक कॉंग्रेसी नेत्यांनी आणि विशेषतः राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी करायलाच हवा. पण आत्मचिंतन न करता राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत घोटाळा झाला असे म्हणत कामठी विधानसभेचे नाव उदाहरण म्हणून सांगितले. त्यांच्या पाठोपाठ कामठीतील कॉंग्रेसच्या स्थानिक नेत्यानेही तोच आरोप केला. याचा अर्थ आता कॉंग्रेसला पराभव पचनी न पडल्याने ते दृष्टिदोष झाल्यासारखे वागत आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी मी त्यावेळी नागपूर जिल्हा ग्रामीण भाजपचा प्रशासकीय कामकाज प्रमुख होतो. मला प्रमुख या नात्याने लोकसभा व विधानसभा निवडणूक कामकाज आणि सुरू असलेली प्रक्रिया जवळून पाहता आली. मी एकटाच नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रत्येक बैठकीला सर्वच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आवर्जून हजर असायचे. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर हे सर्व पक्षांचे जास्तीत जास्त प्रतिनिधी उपस्थित असावे, यासाठी फार आग्रही होते. त्यानुसार नागपूर शहरातील आणि ग्रामीणमधील प्रत्येकी सहा मतदारसंघातील नवीन मतदार नोंदणी, मृत किंवा गाव सोडून गेलेल्यांची नावे वगळणे, मतदारांच्या नावात दुरुस्ती आदी कामे मार्गी लावण्यात आली. प्रत्येक बैठकीत राजकीय प्रतिनिधींना याची लेखी स्वरूपात माहिती दिली जायची. यात काही लपविण्याला जागा नव्हती. विशेष म्हणजे नवीन मतदार नोंदणीत कामठी विधानसभा कायम अग्रेसर राहिली. याला आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रयत्न व त्यांनी राबविलेली मोहीमच कारणीभूत होती. ते जेव्हा पहिल्यांदा आमदार झाले तेव्हाही त्यांनी नवीन दहा हजार मतदारांची नोंदणी केली होती. त्यावेळी त्यांचा सुमारे ७ हजार मतांनी विजय झाला होता. त्यामुळे नवीन मतदार नोंदणीचे महत्त्व त्यांना माहीत आहे. मोठ्या शहरात नवीन मतदारांची नोंदणी प्रयत्नपूर्वक केली तर नक्कीच वाढते. यात आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही. उदाहरण द्यायचे झाल्यास आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी ते केले म्हणूनच जास्त मतदार नोंदणी करण्यात यशस्वी ठरले. लोकसभेत मागे पडलेला पक्ष त्यांना दिसत होता. म्हणून जितक्या मतांनी मागे पडलो, कमीत कमी तितकी तरी नवीन मतदार नोंदणी करायचीच, या जिद्दीने ते कामाला लागले व प्रचंड मतांनी जिंकले. कॉंग्रेसला यात गडबड वाटते, हा त्यांचा दृष्टिदोष आहे. कामठी-मौदा मतदारसंघाबाबत सध्या तेच सुरू आहे, असेच मला प्रांजळपणे वाटते.

**प्रा. श्रीकांत पांडे**/नागपूर

●● ●●

### चिन्नास्वामी स्टेडियमवरील दुर्घटनेला जबाबदार कोण?

पैशाचा हव्यास आणि प्रसिद्धीची भूक मानवाला कसे पशू बनवते, याचे एक ज्वलंत उदाहरण बंगळुरूमधील कर्नाटक सरकार आणि रॉयल चॅलेंजर्सचे व्यवस्थापन व खेळाडू यांच्या संयुक्त विद्यमाने जगाला दिसले. तीन जूनच्या उत्तर रात्री, अहमदाबाद येथे झालेल्या आयपीएलच्या अंतिम सामन्यात विराट कोहलीच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्जचा पराभव केला आणि अठराव्या वर्षी प्रथमच आयपीएल करंडकावर आपले नाव कोरले. याच वेळी आणि याच ठिकाणी त्याबद्दल शानदार समारंभ उत्साहात पार पडला. विराटने मैदानावर डोके ठेवून आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. त्याने आपल्या पत्नीला दिलेले आलिंगन सर्व देशासह जगानेही बघितले.

या पृष्ठभूमीवर, बंगळुरूमध्येच चिन्नास्वामी स्टेडियमवर, पुन्हा एकदा आपल्या विजयाचा लाईव्ह जल्लोष साजरा करण्याचा निर्णय विजयानंतर लगेच घेण्यात आला. अर्थात हा निर्णय राबवणे सोपे काम नव्हते. एकतर बंगळुरू हे भारतातील सर्वाधिक वाहतूक कोंडी होत असलेले शहर आहे. चिन्नास्वामी मैदानाची क्षमता केवळ पस्तीस हजार प्रेक्षकांची! या कार्यक्रमाला अफाट गर्दी होणार, लाखो लोक येणार आणि या गर्दीचे नियंत्रण करणे आपल्याला शक्य होणार नाही म्हणून हा कार्यक्रम एखादा आठवडा पुढे ढकलावा, अशी विनंती बंगळुरू पोलिसांनी लगेचच केली. आदल्या दिवशी रात्रभर झालेल्या कार्यक्रमात पोलिस व्यस्त असल्याने त्यांना आराम करण्याची गरज आहे असेही सांगितले गेले. खुद्द कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनीही अशा अचानक ठरवलेल्या कार्यक्रमाला परवानगी दिली नसल्याचे स्पष्ट केले होते. पण आले आरसीबीच्या (आणि विराट कोहलीच्या) मना, तेथे कोणाचे चालेना या उक्तीप्रमाणे, आपला विजय ॲनकॅश करण्यासाठी आणि पुढील आयपीएलमध्ये मिळणाऱ्या मलिद्याची पेरणी करण्यासाठी अवघ्या चोवीस तासांच्या आत त्यांनी कोणताही विचार न करता, सरकारचा आदेश लाथाडून, हा कार्यक्रम करण्याचा घाट घातला.

कर्नाटकमधील कॉंग्रेस सरकारने आयोजित केलेल्या कार्यक्रमात झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये अकरा लोक मृत्युमुखी पडले तरी कर्नाटक सरकार, कॉंग्रेस पक्ष आणि राहुल गांधींची वक्तव्ये संतापजनक आहेत. कॉंग्रेसचे कायदे हे पक्षाचे फायदे आणि सोयी-गैरसोयीप्रमाणे कसे बदलतात, याचे हे ताजे उदाहरण आहे. इतिहासात कॉंग्रेसने हे अनेकदा केले आहे. आताही मैदानाबाहेर लोक मरत असताना, मैदानाच्या आत मात्र कार्यक्रमाची थिल्लरबाजी सुरूच होती हे सगळ्यात जास्त चीड आणणारे आहे. मुळात हा कार्यक्रम एवढ्या तातडीने करायची काय गरज होती? आणखी काही दिवसांनी व्यवस्थित योजनाबद्ध कार्यक्रम आयोजित केला असता तर काय बिघडणार होते?

या घटनेनंतर, बंगळुरू माझा जीव की प्राण असल्याचे सांगणाऱ्या विराट कोहलीने घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागण्याचे, मृत पावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्याचे, मृतांच्या नातेवाईकांना भेटण्याचे आणि हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस करण्याचेही सौजन्य दाखवू नये, हा आपल्याच निष्ठावंत समर्थकांचा घोर उपमर्द आहे. शेवटी काय तर पैसा महत्त्वाचा! अल्लू अर्जुनच्या अटकेचे समर्थन करणारे राहुल गांधी आता मात्र तोंडाला कुलूप लावून बसले आहेत. आता कोणाला तरी बळीचा बकरा बनवून, या दुर्घटनेला संपूर्ण जबाबदार असलेल्या रॉयल चॅलेंजर्स व्यवस्थापन, खेळाडू आणि कर्नाटक सरकारवर कारवाई करण्याऐवजी हे सगळे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न कॉंग्रेस करत आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### पहिलीपासून सैनिकी शिक्षण : घोषणा स्वागतार्ह, वास्तविकता वेगळीच


नुकतेच भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांविरोधात सशस्त्र सैनिकी कारवाई केली. या कारवाईचे संपूर्ण देशाने स्वागत केले. यानंतर देशातील सर्व नागरिकांमध्ये देशभक्ती जागृत होऊन सर्वांना भारतीय सैन्याबद्दल पुन्हा एकदा गर्व वाटला व सर्वांनी भारतीय सैन्याचे कौतुक केले. अनेक नेत्यांनी देखील भारतीय सैन्याचे कौतुक केले. महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी देखील याचा संदर्भ घेऊन महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीपासून सैनिकी शिक्षण देणार असल्याची घोषणा केली. शिक्षण मंत्र्यांनी ऑपरेशन सिंदूरच्या यशामुळे भारावून भारतीय सैन्याबद्दल कृतज्ञता म्हणून ही घोषणा केली असल्याचे वाटते. कारण खेळण्या, बागडण्याच्या अवघ्या सहा सात वर्षांच्या कोवळ्या वयात विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण झेपेल असे वाटत नाही. त्यामुळे यासाठी किमान माध्यमिक स्तरापासून हे शिक्षण दिले जावे असे वाटते.

याउलट महाराष्ट्र शासन व राज्य शिक्षण मंडळाची सैनिकी शिक्षणाबाबत सद्य:स्थिती व वास्तविकता काही वेगळीच आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळातर्फे सद्य:स्थितीत वर्ग बारावीपर्यंत कोणत्याही प्रकारचे अनिवार्य सैनिकी शिक्षण दिले जात नाही. माध्यमिक स्तरावर वर्ग नववी व दहावीला संरक्षणशास्त्र हा केवळ श्रेणी असलेला वैकल्पिक विषय आहे परंतु राज्यभरातील दरवर्षी केवळ पाच टक्के शाळा आपल्या विद्यार्थ्यासाठी हा वैकल्पिक विषय निवडतात. त्यानंतर उच्च माध्यमिक स्तरावर देखील या विषयाचा समावेश नाही. राज्यातील निवडक शाळांमध्ये एनसीसी (नॅशनल कॅडेट कॉर्प्स) च्या माध्यमातून सैनिकी शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते. परंतु एनसीसी हा केंद्र सरकारचा उपक्रम आहे. मध्यंतरी शिक्षण मंडळाने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी एनसीसीच्या धर्तीवर एमसीसी (महाराष्ट्र कॅडेट कॉर्प्स) ची सुरुवात केली होती. त्याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद देखील लाभला होता. नंतर शासनाने एमसीसी हा उपक्रम देखील बंद केला. राज्यातील निवडक शाळांमध्ये स्काऊट गाईडच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना विविध आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तयार केले जाते. याशिवाय महाराष्ट्रात शासनपुरस्कृत जिल्हानिहाय मुलांच्या व विभागनिहाय मुलींच्या अशा एकूण जवळपास बेचाळीस सैनिकी शाळा आहेत. ज्यामध्ये दरवर्षी वर्ग सहावी ते बारावीचे जवळपास तीस हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळांमध्ये देखील वर्ग सहावी ते आठवीसाठी कुठलाच अनिवार्य सैनिकी अभ्यासक्रम नाही. या शाळांमधील प्रशासन, शिक्षक व सैनिकी अधिकारी यांनी स्वतः तयार केलेला अनुरूप सैनिकी अभ्यासक्रम या वर्गांमधील मुलांना शिकवला जातो. तर वर्ग नववी व दहावीला राज्य शिक्षण मंडळाचा संरक्षणशास्त्र हा श्रेणी विषय अनिवार्यपणे शिकवला जातो. तर वर्ग अकरावी, बारावीला देखील आवश्यक सैनिकी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकवला जातो. या शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासह नियमितपणे आवश्यक सैनिकी प्रशिक्षण देखील दिले जाते. यासाठी महाराष्ट्र शासनाने या शाळांमध्ये अनुभवी माजी सैनिक व सैनिकी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केलेल्या आहेत. या सैनिकी शाळांमधून तयार झालेले विद्यार्थी विविध सैन्यदलात दाखल होऊन देशसेवा देखील करत आहेत.

सध्या राज्य शासन व राज्य शिक्षण मंडळ वर्ग पहिली ते आठवीकरिता बालस्नेही शिक्षणपद्धती राबवीत आहे. या वर्गांच्या व या वयोगटाच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण या निर्णयामुळे प्रभावित होऊ शकते. त्यामुळे शासनाला व शिक्षण विभागाला महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण द्यायचेच आहे तर ते किमान वर्ग नववीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना द्यावे. बारावीनंतर इच्छुक विद्यार्थ्यांना एक वर्षाचे परिपूर्ण सैनिकी प्रशिक्षण देखील दिले जावे जेणेकरून भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत हे मनुष्यबळ देशाच्या कामी येऊ शकेल. इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण न देता किमान वर्ग सहावीपासून विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या राज्यातील शासन पुरस्कृत सैनिकी शाळांना अधिकाधिक प्रोत्साहन देऊन व तेथील प्रशासनाला आणखी आवश्यक सुविधा पुरवून शासन हा उपक्रम प्रभावीपणे राबवू शकते.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

# निष्काम कर्मयोगी :भा.बा. आर्वीकरसर



दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षकीपेशा स्वीकारणारे व आपल्या रचनात्मक कार्याने समाजात आपले ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ, अद्वितीय स्थान निर्माण करणारे, आपल्या विद्यार्थ्यांवर कायमचा प्रभाव टाकणारे काही आदर्श शिक्षक असतात. अशा आदर्शवत शिक्षकांमध्ये *श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेतील सेवानिवृत्त मुख्याध्यापक भास्करराव बाळकृष्ण आर्वीकरसर* यांचे नाव प्रामुख्याने आदर व सन्मानानेच घ्यावे लागेल. भास्करराव आर्वीकरसर यांची शिक्षणक्षेत्रातील प्रदीर्घ सेवाकाळ हा सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे.शैक्षणिक , सामाजिक, राजकीय, प्रशासकीय सर्वच क्षेत्रात सरांनी झंझावात निर्माण केला,हा झंझावात दि १४जून रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी थांबला.सरांनी कायमचा निरोप घेऊन ते इहलोकी प्रवासाला रवाना झाले.भास्करराव आर्वीकरसर यांचा जन्म लातुर जिल्ह्यातील परंतु ते बिडकीनकरच म्हणून शेवटपर्यंत ओळखले गेले. सरांना पाच भाऊ आणि तीन बहिणी, शिक्षणाचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले त्यांचे काका व थोरले बंधू हेही शिक्षकच होते.लहानपणापासूनच अत्यंत जिद्दी व शिक्षणाची आवड असल्याने सरांनी इंग्रजी राजवटीत एकमेव मराठी भाषेत शिक्षण देणाऱ्या मराठवाड्यातील श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगरच्या बिडकीन शाखेवर शिक्षक म्हणून नोकरी पत्करली. बिडकीन परिसर म्हणजे ग्रामीण भागच. शाळा सुरू झाली, अनंत अडचणी त्याकाळात होत्या परंतु नियुक्तीच मुख्याध्यापकपदाची (जन्मजात मुख्याध्यापक) धुरा असणाऱ्या भास्करराव आर्वीकर यांनी मोतीलालजी तोतला, त्र्यंबकराव सोनटक्के, डॉ.मधुकरराव कोनार्डे, मोहनराव ठाणगे या तत्कालीन स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्यांच्या सहकार्याने या समस्यांवर मात केली.

शिक्षण हे केवळ पुस्तकांपुरते अगर परीक्षाकेंद्रित न राहता ते जीवनाभिमुख कसे होईल याची काळजी मुख्याध्यापक भास्करराव आर्वीकरसर यांनी सुरूवातीपासून घेतली. शिक्षणाची उद्दिष्टे व त्यातून रुजवायची मूल्ये यांचा सातत्याने विचार करून नियोजनबद्ध आखणी सरांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने केली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.सरांनी श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीनच्या शाळेमध्ये कल्पकतेने विविध उपक्रम राबविले. भविष्यकाळातील तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून बिडकीनसारख्या ग्रामीण भागात *तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.* बिडकीन हा शेतीप्रधान भाग आहे, विद्यालयातील विद्यार्थी हे शेतकरी पुत्र आहेत. त्यांना शेतीविषयक उपयुक्त माहिती मिळावी म्हणून विद्यालयाशी संलग्न असलेला *शेती/कृषीशास्त्र हा विषय सुरू केला* व प्रशालेच्या स्वतःच्या मालकीच्या पाच एकर जागेवर विद्यार्थी स्वतः शेतीविषयक प्रयोग करायला लागले. मला वाटते कदाचित तो महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग असेल. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फुल्लिंग जतन व्हावे यासाठी *एन. सी. सी. विभाग सुरू केला.* बालवयातच संगीत विषयक गोडी निर्माण व्हावी यासाठी *संगीत शिक्षकाची पूर्ण वेळ जागा उपलब्ध करून* घेतली.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व पालकांना चांगले व्याख्यान, विचार ऐकायला मिळावे म्हणून *कै. त्र्यंबकराव सोनटक्के बहिःशाल व्याख्यानमाला* सुरू करून वैचारिक मंथनासाठी मेजवानी उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांच्या सृजनात्मक लेखनशैलीचा विकास व्हावा या उद्देशाने *दैनिक सारस्वत या नावाने हस्तलिखित सुरू केले.* शालेय जीवनात व्यवहारज्ञान प्राप्त व्हावे म्हणून ना नफा ना तोटा या तत्वावर *कुमार वस्तू भांडार व विद्यार्थी पतपेढी सुरू केली.*भास्करराव आर्वीकर सर म्हणजे एक चालतंबोलतं विद्यापीठच. अतिशय अभ्यासू, कल्पक, प्रयोगशील मुख्याध्यापक. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणारे सर अतिशय वक्तशीर व शिस्तप्रिय. त्यांच्याविषयी विद्यार्थी, शिक्षक, पालक सर्वांच्याच मनात एक आदरयुक्त भीती व धाक. सरांचा हजरजबाबीपणा, विनोदबुद्धी अफलातूनच. सर आम्हाला मराठी विषय शिकवायचे, मुख्याध्यापकपदाची जबाबदारी सांभाळत असतानासुद्धा सरांनी तासिका कधीच बुडवली नाही. अतिशय तन्मयतेने अध्यापन करायचे. शिक्षकांची खरी ओळख त्याचे अध्यापन असते. सरांनी ३७ वर्षे मुख्याध्यापक व शिक्षक म्हणून अविरतपणे सेवा केली. आपण शिकवत असलेल्या विषयाचे सखोल ज्ञान, विषय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे उत्कृष्ट कौशल्य, कसब सरांकडे होते. एक विद्वान, व्यासंगी, प्रयोगशील व उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक म्हणून सरांचा नावलौकिक होता. चौफेर अभ्यास व ज्ञान असल्याने प्रशासनावर सरांचे प्रभुत्व होते. सामाजिक कार्यात देखील सर तेवढ्याच हिरीरीने भाग घ्यायचे. *भगवती सहकारी पतसंस्था, प्रसाद वाचनालय* आणि आजचे *सृजन माध्यमिक विद्यालय* सरांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सुरू केले. सरांनी परदेशातसुद्धा अनेक विषयांवर प्रबंध सादर केले. सन १९९२ मध्ये सरांनी अमेरिकेतील हार्टफोर्ट येथे जागतिक शैक्षणिक परिषदेत निबंधाचे सादरीकरण केले. सरांनी ऑस्ट्रेलिया , अमेरिका यांसारख्या अनेक प्रगत देशातील शिक्षण पद्धतीचा, तेथील उपक्रम, प्रकल्प यांचा बारकाईने अभ्यास केला व परत आल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून ते प्रशालेत राबविण्याचा प्रयत्न केला.अवघड गोष्ट साध्या, सुटसुटीत भाषेत सोपी करून सांगण्यात सरांचा हातखंडा.सरांनी *ग्रंथालय चळवळ* व *मुख्याध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून उभारणीपर्यंतचे भरीव योगदान* दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे कार्यवाह व अध्यक्ष म्हणून त्यांनी भरीव कार्य केले. शिक्षक आमदार पी.जी. दस्तूरकर,प.म. पाटील, वसंत पाटील यांच्या सहकार्याने त्यांनी अनेक शिक्षक हिताचे निर्णय शासनास घेण्यास भाग पाडले. सरांनी निवृत्तीनंतर स्वतःला शेवटपर्यंत वाचन चळवळ व ग्रंथालय चळवळीत झोकून दिले. विद्यार्थ्यांना बालवयातच वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी सरांनी बालकुमार साहित्य संमेलनासाठी आग्रह धरला. हे बालकुमार साहित्य संमेलन त्यांनी बिडकीन सारख्या ग्रामीण भागात घेतले, त्यामागे देखील त्यांचा व्यापक दृष्टिकोन होता.सरांच्या जाण्यामुळे ग्रंथालय चळवळ, वाचन चळवळ , बालसाहित्य चळवळ यांची अपरिमित हानी झाली हे निश्चित.मला सांगायला अभिमान वाटतो. आज माझ्यासारखे अनेक सरांचे माजी विद्यार्थी या संस्थेत कार्यरत आहेत ते केवळ सरांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे किंवा त्यांनी केलेल्या मदतीमुळेच. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याकाळी येण्या-जाण्याची सुविधा नव्हती म्हणून सरांनी अशा *विद्यार्थ्यांसाठी शाळेतच राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली* व रात्रीच्या जेवणासाठी भाजी शाळेतच बनवून उपलब्ध करून दिली कारण सकाळी भाकरी गावाकडून यायची परंतु डब्यातील भाजी रात्रीपर्यंत खराब व्हायची. पैशाअभावी अनेक विद्यार्थी शाळा सोडून देण्याचा विचार करायचे तेव्हा त्यांना आर्थिक मदत देखील सरांनी केलेली आहे. *ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गणित, इंग्रजी विषयांच्या मोफत जादा तासिकेची सुविधा* सरांनी शाळेतच उपलब्ध करून दिली होती. त्यांची वक्तृत्वशैली, मार्मिक हजरजबाबीपणा, विविध स्तरांतील अधिकारी यांच्याशी असलेली जवळीक, त्यांचा आपल्या कौशल्याने शाळेसाठी उपयोग करून घेण्याचे कसब या सगळ्या त्यांच्यामधील गुणांचा माझ्यावर नेहमीच प्रभाव राहिला. मला आठवतंय त्यांच्या हाताखाली छत्रपती संभाजीनगर येथील प्रशालेत कार्यरत असताना विविध प्रशिक्षणासाठी आम्ही शिक्षक जायचो तेव्हा शाळेत पुन्हा आल्यानंतर सर आम्हाला शिपायामार्फत बोलावून घ्यायचे व प्रशिक्षणाशी संबंधित प्रश्न विचारून फिरकी घ्यायचे. सरांची स्कुटर शाळेत उभी आहे हे बघूनच सहकारी दचकायचे. सरांनी कधीही कोणाला अपमानित केले नाही किंवा पूर्वग्रहदूषित वागणूक दिली नाही. मी स्वतः ला भाग्यवान समजतो, मला त्यांचा विद्यार्थी व सहकारी शिक्षक अशा दोन्हींही भूमिकेतून काम करायले मिळाले. एकदा सर शाळेत राऊंड घेत असताना एक सहकारी शिक्षक पाच दहा मिनिटे काही कारणांमुळे उशिरा आले तेव्हा सरांनी त्यांना बघून काहीही न बोलता शिपायाला शाळेची घड्याळ दहा मिनिटे पुढे आहे ती मागे करण्यास सांगितले. हे ऐकून त्या शिक्षकांना त्यांची चूक लक्षात आली व त्यानंतर ते कधीच उशिरा आले नाही. बिडकीनच्या श्री सरस्वती भुवन प्रशालेचे आज जे भव्यदिव्य रूप बघायला मिळते त्याची भक्कम व मजबूत पायाभरणी सरांनीच केलेली आहे . इहलोकीचा निरोप घेतांना सरांचे वय ८६ वर्षे होतें परंतु तरीही सर शेवटपर्यंत कार्यमग्न राहिले.. तरीही सर न थांबता, न थकता, अविरत, अविचल तेवढ्याच उत्साहाने कार्यरत होते.. आचार्य दादा धर्माधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे *तपस्वीता, तेजस्वीता व तत्परता हे तारूण्याचे तीन त' कार सरांकडे होते, म्हणजे खऱ्या अर्थाने सर शेवटपर्यंत तरूणच होते. सरांच्या पाठीमागे पत्नी सुरेखाताई, मुलगा विशाल, मुली वृषाली ,वृंदा ,पुतणे ,सुन, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे मुलगा विशाल हा ऑफ सेट प्रिंटिंग व्यवसायात स्थिरस्थावर आहे.माझ्यासारख्या हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य आर्वीकरसर यांनी घडवले आहे. आम्ही आज जे काही आहोत ते केवळ आणि केवळ भास्करराव आर्वीकर

सर यांच्यामुळेच. अशा आदरणीय दीपस्तंभास माझे शतशः प्रणाम.

जे चरण आचरणीय असतात तेथेच मस्तक झुकले जाते व तेच आदरणीय वाटतात.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांच्याकडून
# पत्रकार बांधव आणि पोलीस कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जून**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस बीड जिल्हा मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांच्याकडून आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस यांचा गौरव करत रेनकोट देवून अनोख्या पध्दतीने साजरा केला आहे.




मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस राज्यभरात मनसैनिक वेगवेगळी शिबिरे राबवून साजरे करत असतात बीड जिल्हा मनसेने मात्र जनतेच्या सेवेसाठी आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस सदैव तत्पर असतात त्यांचा गौरव होणे गरजेचे आहे असा मनोमन निर्णय एकमताने घेवून दि.१४ जून २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार बांधवांचा आणि बस स्टँण्ड येथील पोलीस चौकीमधील पोलीस कर्मचार्यांना रेनकोट देवून सन्मान केला आहे. यावेळी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांच्यासह सिद्धेश्वर धोंडगे, कृष्णा देवकुळ, केशव रत्नपारखे , गणेश भोसले, टिनू राजपूत आदी मनसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## संकष्टी चतुर्थी

बीड ज्येष्ठ महिन्यातील संकष्टी चतुर्थीनिमित्त शनिवारी बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नामलगाव येथे श्री आशापुरक गणेशाचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भाविकांच्या मंदिरात रांगा लागल्या होत्या.





## प्रा.चंद्रकांत मुळे 'नवभारत एज्युकेशन समिट २०२५' ने सन्मानित
## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नैतिकतेने व्हावा : मंत्री आशीष शेलार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जून**

पूर्वी हाताच्या बोटांवर आकडे मोजले जायचे. नंतर हे काम कॅल्क्युलेटर आणि संगणक करू लागला. आता एका मशिनसमोर फक्त बोलावे लागते, सर्व काम ती मशिन करून देते. आता आपण आयटी. एआय शिवाय राहू शकत नाही. शैक्षणिक संस्थांमध्येही आता याचा वापर वाढू लागला आहे. किंबहुना समाजाच्या सर्वच क्षेत्रात या तंत्रज्ञानाने शिरकाव केला आहे. पण हे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरताना आपण त्याचा वापर नैतिकतेने केला पाहिजे अशी अपेक्षा राज्याचे सांस्कृतिक तथा माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी यावेळी व्यक्त केली.यावेळी बीड जिल्ह्यातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्राध्यापक चंद्रकांत मुळे यांना सन्मानित करण्यात आले. नवभारत एज्युकेशन समिट २०२५ च्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा–या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव नवभारत समूहाकडून होत आहे हे निश्चितच कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार राज्याचे सांस्कृतिक तथा माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी काढले. नवभारत समूहाकडून मुंबईतील ताज प्रेसिडेंट येथे 'नवभारत एज्युकेशन समिट २०२५' या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री आशिष शेलार, उत्तरप्रदेशचे तंत्रशिक्षण मंत्री आशिष सिंग पटेल, मेघाश्रेय संस्थेच्या संस्थापिका सीमा सिंग आणि नवभारत समूहाचे संचालक वैभव माहेश्वरी, नवभारत समूहाचे अध्यक्ष ए. श्रीनिवास उपस्थित होते. नवभारत समूहाकडून मुंबईतील ताज प्रेसिडेंट येथे 'नवभारत एज्युकेशन समिट २०२५' या पुरस्कार वितरण मंत्री आशिष शेलार, उत्तरप्रदेशचे तंत्रशिक्षण मंत्री आशिष सिंग पटेल, मेघाश्रेय संस्थेच्या संस्थापिका सीमा सिंग आणि नवभारत समूहाचे संचालक वैभव माहेश्वरी, नवभारत समूहाचे अध्यक्ष ए. श्रीनिवास यांच्या उपस्थितीत करण्यात आला.प्रा. चंद्रकांत मुळे. हे बीड जिल्ह्यात मागील २८ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात अध्यापन, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसह विविध पदांवर कार्य करत शिक्षण, शिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या हक्कासाठी सक्रिय पुढाकार घेत आहेत. अंबाजोगाई येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था मुख्य प्रशासकीय अधिकारी, बीड येथील चंपावती शिक्षण संस्थेचे सभापती आणि कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक संघटनाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदावर ते कार्यरत असून शैक्षणिक कार्य जोमाने सुरू आहे. त्याबद्दल प्रा. चंद्रकांत अनंतराव मुळे यांना मुंबई येथे नवभारत एज्युकेशन पुरस्कार मंत्री महोदय यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.



# परळीचा युवा संशोधक सुजित पिंपळेच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

### भारताच्या हरित भविष्यासाठी एक मजबूत पाऊल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ जून**

भारत सरकारने नेट झिरो कार्बन उत्सर्जनचे लक्ष्य ठेवले आहे. या दृष्टीने शास्त्रज्ञ प्रयोगाद्वारे प्रयत्न करत आहेत. वाराणसी येथील भारतीय तंत्रज्ञान संस्था आयआयटी येथे संशोधन करत असलेले मूळचे परळी येथील संशोधक सुजित जयश्री युवराज पिंपळे यांचा संशोधन पर प्रबंध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या 'रासायनिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान' या जर्नल मध्ये प्रकाशित झाला आहे. सुजित पिंपळे यांचे हे संशोधन उत्सर्जन शून्यावर आणणे या राष्ट्रीय उद्दिष्टाशी थेट संबंधित आहे. शास्त्रज्ञ सुजितच्या अभिमानास्पद कामगिरीबद्दल परळीकरांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), वाराणसी येथील रासायनिक अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात संशोधन करत असलेले सुजित पिंपळे यांचा संशोधनप्रबंध कार्बन डायऑक्साइड कॅप्चरसाठी बायफेसिक टीका, टिमीडा मिश्रणाचे प्रायोगिक आणि विशिष्टता विश्लेषण आंतरराष्ट्रीय दर्जाचे जर्नल, 'रासायनिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान' मध्ये प्रकाशित झाले आहे. या जर्नलचे प्रकाशन विली या प्रसिद्ध जागतिक प्रकाशन संस्थेने केले आहे. उद्योगधंद्यांतून, थर्मल पॉवर प्लांट्समधून आणि इतर मानवी क्रियाकलापांमधून मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साइडचे वातावरणात उत्सर्जन होते. यामुळे जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग), हवामान बदल, समुद्र पातळीत वाढ, तसेच जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत आहेत. हे टाळण्यासाठी कार्बन डायऑक्साइड शोषण व पुनर्वापर तंत्रज्ञान आवश्यक ठरत आहे. पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत कमी ऊर्जा खर्चात ही प्रक्रिया करता येत असल्याने ती आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर आहे.

संशोधनाची वैशिष्ट्ये.....

या नवीन संशोधनात सुजित पिंपळे यांनी द्विस्तरीय अमाइन सॉल्व्हंट आधारित एक नवे कार्बन डायऑक्साइड कॅप्चर सोल्यूशन विकसित केले आहे. यात ट्रायइथिलीनेटेटेट्रामाइन (टिटा) व (टिमीडा) हे दोन अमाइन सॉल्व्हंट्स वापरले आहेत. या सॉल्व्हंटचे विविध प्रमाणातील मिश्रण तपासले गेले. ४०ओ सेल्सिअसवर फेज सेपरेशन (पानी आणि अमाइनचे विभाजन) स्पष्ट दिसून आले, ज्यामुळे प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनते.६० टक्के लोअर फेज वॉल्युम मध्येच ८९ टक्के लोडिंग क्षमता प्राप्त झाली, जी २.८८ एमओएल कार्बन डायऑक्साइड इतकी होती. या नवीन सॉल्व्हंटमुळे पारंपरिक अमाइन सोल्यूशन्सच्या तुलनेत कमी पुनरुत्थापन ऊर्जा लागते. या शोधामुळे औद्योगिक कार्बन डायऑक्साइड कॅप्चर प्रक्रियांना ऊर्जा–दक्ष, अधिक किफायतशीर आणि व्यावसायिकदृष्ट्या उपयुक्त बनवणे शक्य आहे. याचा उपयोग कोळशावर आधारित थर्मल पॉवर प्लांट्स, सिमेंट इंडस्ट्री, स्टील इंडस्ट्री यांसारख्या क्षेत्रांत होऊ शकतो. संशोधनाचा पुढचा टप्पा म्हणजे या सॉल्व्हंटचा ऑक्सिडेटिव्ह डिग्रेडेशन मटेरियलवर होणारा गंज यांचा अभ्यास करणे आणि पायलट–स्केल प्रयोगांद्वारे याचे मोठ्या प्रमाणावर मूल्यांकन करणे आहे. संशोधक सुजित पिंपळे यांचे हे कार्य जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी आणि शाश्वत तंत्रज्ञानाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे संशोधन भारताच्या हरित भविष्यासाठी एक मजबूत पाऊल आहे हे अधोरेखित करण्यासाठी उपयुक्त ठरेल.



# परळीकडून लातूरमार्गे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा द्या

### प्रवाशांच्या सोयीसाठी सर्व रेल्वे गाड्या सुरळीत चालू ठेवा; राजेभाऊ फड यांचे रेल्वे मंत्र्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ जून**

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ हे देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असे पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग आहे. दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर परळी वैजनाथ रेल्वे स्थानक हे जिल्ह्यातील सर्वात जुने आणि एकमेव स्थानक असून येथील प्रवासी संघटनांच्या काही प्रमुख मागण्या आहेत. त्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून मार्गी लावाव्यात यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री तसेच दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक मागण्या केल्या आहेत.



याबाबत अधिक असे की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे अनेक रेल्वे प्रवाशांनी विविध समस्या मांडल्या होत्या. त्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसेच सिकंदराबाद विभागाचे व्यवस्थापक यांना पत्र लिहून प्रवासी संघटनेच्या मागण्या पोचवल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने म्हटले आहे की, परळी वैजनाथ येथून लातूररोड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना मतदारसंघातील घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा. जेणेकरून परळी, अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर आणि रेणापूर तालुक्यातील प्रवाशांची सोय होणार आहे. याचबरोबर कोरोना महामारीच्या काळात काही रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, त्यापैकी अमरावती – पुणे तसेच काकीनाडा – साईनगर (शिर्डी) या गाड्या नियोजित वेळापत्रकानुसार नियमित सुरू ठेवण्यात याव्यात. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता काही गाड्यांच्या डब्यांच्या संख्येत गरजेनुसार वाढ करण्यात यावी, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय होणार नाही अशा आशयाचे पत्र राजेभाऊ फड यांनी प्रवासी संघटनांच्या आग्रहास्तव केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पाठवले आहे.

# माणुसकी जपत सामाजिक कार्यकर्त्याकडून बेवारस मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कार

## नातेवाईकांनी नाकारले, परळीकरांनी स्वीकारले

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ जून**

बालाजी सोळंके नामक बेवारस व्यक्ती हा मागील २० वर्षापासून परळी शहरातील नेहरू चौक (तळ) परिसरात राहत होता.रस्त्याच्या बाजूला मयत झाल्याचे शनिवारी सकाळी दिसून आले.नितीन शिंदे यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात व पालिकेस कळवले.

मयत सोळंके यांची परभणी शहरात वासत्वास असलेली रक्तातील नात्याची सखी बहीण असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्यांच्याशी संपर्क केला असता भाऊ आणि माझा मागील २० वर्षांपासून काहीही संबंध नाही आसे मयताच्या बहिणीकडुण निर्दयीपणे सांगीतले व त्यांच्या भावाचा अंत्यविधी करण्यास त्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला.



त्यामुळे निर्माण झालेला पेच प्रसंग पाहता सामाजीक बांधिलकी व मृत्यु पश्चात होणारी मानवी देहाची अवहेलना होऊ नये या भावनेतुन परळी शहरातील सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर असलेल्या नितीन शिंदे, सेवकराम जाधव, शिवाजी देशमुख, आबासाहेब देशमुख यांनी घटणेचे गांभिर्य पाहता परळी शहरातील समाजकार्यात एक पाऊल पुढे असणाऱ्या व्यक्ती आणि पोलीस प्रशासणाच्या सहकार्याने मयत बेवारस बालाजी सोळंके यांचा अंत्यसंस्कार करण्यासाठी पुढाकार घेतला.

त्यानुसार पोलीस प्रशासन,नगर पालिका प्रशासन आणि परळी शहरातील सामाजीक क्षेत्रातील मान्यवरांनी मिळून शनिवार रोजी ५:३० वाजता परळीत सदरील बेवारस मयत व्यक्तीचा अंत्यविधी करण्याचा निर्णय घेतला. या वेळी कर्तव्यावर आसलेल्या चरणसिंग वळवी (बीट हवलदार) पोलीस हेड कॉन्स्टेबल परळी शहर पोलीस स्टेशन यांच्या समक्ष व अधिकृत सहमतीने सामाजीक कार्यकर्ते नितीन शिंदे, सेवकराम जाधव सर, शिवाजी देशमुख,वेगवान मराठीचे उपसंपादक पत्रकार केशवराव मुंडे आबासाहेब देशमुख, उत्तम मोरे यांच्यासह साजिद खान गुत्तेदार यांच्या दुकाना समोर रात्रीच्या वेळी सदरील मयत व्यक्ती आसऱ्याला झोपत आसे आणि त्यामुळे आपल्या दुकाणाचे संवक्षण होते याची जाण ठेऊण जाती धर्माचे बंधन तोडुण याप्रसंगी अंत्यविधी साठी लागणारे लाकडं (सरपन) दिले.तर बेकरी वाले माहेमूद खान, प्लम्बर नासिरभाई, अन्नू भाई व इतर बांधव देखील अंत्यविधीस उपस्थित होते. या वेळी उपस्थित शिवाजीराव देशमुख आणि केशवराव मुंडे यांच्या कडुण मयत बालाजी सोळंके यांच्या पार्थिवास पुष्पहार अर्पण करुण श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रतिष्ठित व सामाजिक क्षेत्राची जाण व आवड असलेल्या मोजक्याच मान्यवरांच्या उपस्थित परळी वैजनाथ येथील वैकुंठ धाम स्मशान भुमित मयत बालाजी सोळंके यांच्यावर हिंदु धर्माच्या रिती रिवाजा प्रमाणे अंत्यसंस्कार विधी करण्यात आला.

## महाडीबीटी पोर्टलवर अ.जा. अ.ज. प्रवर्गातील शेतकऱ्यांनी ठिबक तुषार घटकासाठी अर्ज करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जून**

राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी ठिबक, तुषार घटकासाठी अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड एस.एम.साळवे यांनी केले आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना–प्रति थेंब अधिक पिक योजनेतर्गत ठिबक/तुषार घटकासाठी महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याकरिता ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध आहे. या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.

अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.शेतकरी वर्गवारी, राष्ट्रीय कृषि विकास योजना – प्रति थेंब, अधिक पिक योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना,बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजना.

अनुदान

अल्प व अत्यल्प भूधारक (२ हे.पर्यंत क्षेत्र ) ५५ टक्के, २५ टक्के, १० टक्के, ९० टक्के, बहु भूधारक

(२ हे.पेक्षा जास्त क्षेत्र ) ४५ टक्के ३० टक्के १५ टक्के ९० टक्के.

फायदे –

१.ठिंबक तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होते.

२.पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची वाढ रोखण्यास मदत होते.

३.सिंचन क्षेत्रात वाढ होईल.

जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

सोलापूर तरूण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# स्पर्धेच्या युगातही तरूण भारतने राष्ट्रीय विचारधारा जपली– अ‍ॅड माने

## हिंगोली जिल्हा कार्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा, शुभेच्छांचा वर्षाव, अनेक मान्यवरांची उपस्थिती





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १५ जून**

मिडीयामध्ये आता खूप मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेच्या युगात अनेकांची भूमिका वेग–वेगळी आहे परंतु दैनिक तरूण भारतने राष्ट्रीय विच–ारधारा कायम ठेवली आहे असे उद्‌गार माजी खासदार अ‍ॅड शिवाजीराव माने यांनी वर्धापन दिनाच्या विशेष पुरवणीचे उद्‌घाटन करतांना काढले.

येथील शासकीय विश्रामगृहात रविवार दि १५ जून रोजी दैनिक सोलापूर तरूण भारतचा जिल्हा कार्यालयाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी विशेष पुरवणीचे उद्‌घाटन माजी खासदार शिवाजीराव माने यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, विराट राष्ट्रीय लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, ज्येष्ठ पत्रकार तुकाराम झाडे, जिल्हा काँग्रेसचे प्रवक्ते विलास गोरे, विराट राष्ट्रीय लोकमंचचे महासचिव नौमान नावेद आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उद्‌घाटनपर भाषणात बोलतांना अ‍ॅड शिव–ाजीराव माने म्हणाले की, तरूण भारत आम्ही महाविद्यालयीन जीवनात असल्यापासून वाचतो. महाविद्यालयात असतांना आम्ही आमच्या प्रतिक्रीया छोट्याछोट्या कॉलममध्ये व्यक्त करीत होतो. या वर्तमान पत्राने विचारांशी कधीही तडजोड केली नाही. राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय विचारांचा प्रचार आणि प्रसार संपादकीय लेखांमधून नेहमी पहायला मिळाला. आज मिडीयामध्येही प्रचंड प्रमाणात स्पर्धा निर्माण झाली आहे. या स्पर्धेत आजही तरूण भारत टीकून आहे. मागील ३९ वर्षाचा दीर्घ प्रवास तरूण भारतने पूर्ण केला असून यापुढेही तरूण भारतच्या परिवाराला हार्दीक शुभेच्छा अ‍ॅड माने यांनी दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांनीही सोलापूर तरूण भारतला वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत असतांना वर्तमान पत्रांनी सामाजिक प्रश्न आणि गोरगरीबांना न्याय देण्यासाठी आवाज उठवला पाहीजे. अन्यायाविरूध्द लढणारा वर्तमानपत्राची नेहमीच दखल घेतली जाते. मिडीया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यामुळे याची दखल सरकारला घ्यावीच लागते. वर्तमान पत्र हा समाजाचा आरसा असला पाहीजे म्हणूनच वर्तमान पत्राला दर्पण असे देखील म्हटल्या जाते. वर्तमान पत्रातील बातमीची गंभीरता ही तिच्या मांडणीवरून आणि आणि विश्लेषणावरूनच लक्षात येते. बातमीत सत्यता असेल तर त्याची समाज आणि शासन निश्चितपणे दखल घेते. मागील अनेक वर्षापासून जिल्ह्यात तरूण भारतच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रातील बातम्या प्रसिध्द केल्या जातात. त्यामुळे या वर्तमान पत्राची वाचकही दखल घेतो. तरूण भारतने समाजात विश्वासअर्हता कमावली आहे.

यावेळी विराट राष्ट्रीय लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल यांनी सोलापूर तरूण भार–तला शुभेच्छा देत आम्ही ज्या ज्यावेळी सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांवर आंदोलने केली त्या त्या वेळी तरूण भारतने विस्तृत आणि निर्भिडपणे बातम्या प्रकाशित केल्या. समाजातील प्रश्नांवर नेहमीच तरूण भारत–ने आवाज उठवला आहे. यापुढेही अशाच प्रकारचे सहकार्य होईल अशी अपेक्षा यावेळी शेख नईम यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रमुख मान्यवरांचा सोलापूर तरूण भारतच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांनी तरूण भारत परिवाराचा सत्कार करीत हार्दीक शुभेच्छा दिल्या. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दैनिक तरूण भारतला शुभेच्छा दिल्या.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना माजी खा. अ‍ॅड शिवाजीराव माने, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, ज्येष्ठ पत्रकार तुकाराम झाडे, विराट लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, जिल्हा प्रतिनिधी संजय कुलकर्णी, शहर प्रतिनिधी विजय गुंडेकर, लखन यादव, मारोती बेंडे आदी.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा प्रतिनिधी संजय कुलकर्णी, शहर प्रतिनिधी विजय गुंडेकर, लखन यादव, मारोती बेंडे आदींची उपस्थिती होती.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, रजनी पाटील, क्रिष्णा यहीटीया, संजय कुलकर्णी.



हिंगोली–सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना भाजपच्या नेतया सुनीताताई मुळे, रजनी पाटील, क्रिष्णा रूहीटीया, जिल्हा प्रतिनिधी संजय कुलकर्णी, शहर प्रतिनिधी विजय गुंडेकर, मारोती बेंडे.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, माजी खासदार शिवाजीराव माने, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, शेख नईम शेख लाल, विलास गोरे, संजय कुलकर्णी, विजय गुंडेकर आदी.



हिंगोली–सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना सामाजिक कार्यकर्ते मुनीर पठाण, पत्रकार संजय कावडे, संजय कुलकर्णी, विजय गुंडेकर, मारोती बेंडे.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना माहीती अधिकारी प्रभाकर बारहाते, चंद्रकांत कारभारी, जिल्हा प्रतिनिधी संजय कुलकर्णी, शहर प्रतिनिधी विजय गुंडेकर, लखन यादव, मारोती बेंडे.



हिंगोली–सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना प्रसिध्द नेत्ररोग तज्ज्ञ डॉ किशन लखमावार, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जि प्र संजय कुलकर्णी, श प्र विजय गुंडेकर, लखन यादव आदी.



हिंगोली–सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, संजय कुलकर्णी, विजय गुंडेकर.



हिंगोली–सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना जिल्हा परिषदेचे लेखाधिकारी श्रीपाद गारूडी यांच्यासह डॉ किशन लखमावार, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जितेंद्र भट्ट, संजय कुलकर्णी, विजय गुंडेकर, लखन यादव, मारोती बेंडे.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना पत्रकार कल्याण देशमुख, दिलीप हळदे, प्रेस फोटोग्राफर सुनील पाठक, जिल्हा प्रतिनिधी संजय कुलकर्णी, शहर प्रतिनिधी विजय गुंडेकर आदी.



हिंगोली–सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना प्रेस फोटोग्राफर केदार गुंडेकर, रोहीत गुंडेकर, संजय कुलकर्णी, मारोती बेंडे.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना पत्रकार गजानन लोंढे, संजय कावडे, जिल्हा प्रतिनिधी संजय कुलकर्णी, शहर प्रतिनिधी विजय गुंडेकर, मारोती बेंडे आदी.
सर्व छाया– केदार गुंडेकर, रोहीत गुंडेकर



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना बजरंग दलाचे जिल्हा संयोजक कैलास श्रीनाथ, विश्व हिंदू परिषदेचे राजेंद्र हलवाई, संजय कुलकर्णी, विजय गुंडेकर, जितेंद्र भट्टू, मारोती बेंडे.



हिंगोली– सोलापूर तरूण भारत जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देतांना भाजपचे कार्यकर्ते दिपक सेठी, जितेंद्र भट्ट, संजय कुलकर्णी, विजय गुंडेकर, लखन यादव

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# चार गावात अवैध दारू हातभट्टीवर मास रेड

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.१५ जून -**

नांदेड जिल्ह्यात सध्या ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर मास रेड करण्याचा धडाका सुरू आहे.त्याच अनुषंगाने माहूर तालुक्यातील चार गावात मोहफूल व रसायण मिश्रित अवैध हातभट्टी दारूच्या अड्डयावर पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत दि.१४ जून रोजी अचानक मास रेड टाकून एकाच दिवशी चार अवैध हातभट्टी दारू विक्रेत्यांवर चार गुन्हे दाखल करून, २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नव्यानेच रुजू झालेले पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी आपल्या नावाप्रमाणे अवैध धंदे चालकांविरुद्ध कडक आणि धडक कारवाईचा श्रीगणेशा केला असून, शनिवार दि. १४ जून रोजी आपल्या सहकाऱ्यांसह विविध ठिकाणी सकाळी ०६ वाजता पासून ते दुपारी ०१ वाजता च्या दरम्यान मास रेड अनुषंगाने अचानक धाडी टाकून



चार अवैध हातभट्टी दारु विक्रेत्यांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. तर या कारवाईत २७ हजार रुपयांचा हातभट्टी दारुचा साठा देखील जप्त करण्यात आला आहे. या जबरदस्त धाडसी रेडच्या कारवाईमुळे अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

माहूर तालुक्यातील पोलिस स्टेशन हद्दीत ग्रामीण भागातील काही गावात अवैध हातभट्टीची दारू विक्री सुरू झाल्याच्या तक्रारी आल्याने पोनि. गणेश कराड यांनी पोलीस उपनिरीक्षक पालसिंग ब्राह्मण,पोलीस उपनिरीक्षक संदीप अनेबोईनवाड यांचे वेगवेगळे पथक तयार करून कूपटी, रामपूर तांडा, पापलवाडी आणि तांदळा या गावात अचानकपणे धाडी टाकून चार गुन्हे दाखल केले. यामध्ये एकूण २७ हजार रुपयाचा हातभट्टी दारूचा साठा नष्ट करणे कामी जप्त करण्यात आला आणि चार दारू विक्री करणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे या धाडीच्या कारवाई दरम्यान दारूसाठा जप्त करण्यासाठी गेलेल्या पोलिसांना काही महिलांच्या असभ्य वर्तणुकीचा देखील सामना करावा लागला.

या कारवाईत ए.एस.आय. बाबू जाधव. पोलीस नाईक प्रकाश गेडाम, पोहेकाँ. गजानन चौधरी, शारदासूत खामनकर, पोकॉ. सागर दरंगे, नवनाथ कोरडे, ज्ञानेश्वर वेलदोडे, प्रशांत भोपळे, संदीप गोपनवाड, दत्ता सोनटक्के,ज्ञानेश्वर खंदारे,पवन राऊत, महीला पोहेकॉ. पुष्पा पुसणाके,महिला पोलीस सारिका राठोड,सोनू ताई भुरके,शिल्पा राठोड,शिवनंदा जाधव यांचेसह गृहरक्षकदलाचे जवान व स्थानिक पोलीस पाटलांनी भाग घेऊन चार गुन्हे दाखल केल्याने अवैध हातभट्टी दारू विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ माजली आहे.

# रेल्वे क्रॉसिंग अंडर ब्रीज संदर्भात दिल्ली येथे सुनावणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१५ जून -**

शहरातील शिवाजीनगर परिसरात निर्माणधीन असलेल्या रेल्वे क्रॉसिंग अंडर ब्रिजच्या रुंदी व आकारामुळे उद्भवलेल्या गंभीर प्रश्नाला सोडवण्याच्या दृष्टीने आ. भीमराव केराम यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाने महत्वाची पाऊले उचलली असून या प्रकरणाची सुनावणी येत्या २३ जून रोजी दिल्ली येथे आयोजित केली आहे.

हा प्रकार रेल्वे मार्ग क्रमांक MDR-७, ०/०, ०/१२, किनवट, महाराष्ट्र येथे असलेल्या रेल्वे क्रॉसिंग गेटच्या अडचणींशी संबंधित आहे. सदर संदर्भात आ. भीमराव केराम, यांनी दिनांक ०७.०४.२०२५ रोजी आयोगाकडे लेखी तक्रार केली होती. या तक्रारीसंदर्भात राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे यांच्या पाठपुराव्या मुळे तथा आमदार भिमराव केराम यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने राष्ट्रीय जनजाती आयोगाने नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, नांदेड रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक प्रदीप कामले आणि दक्षिण मध्य रेल्वेचे जनरल मनेजर लोकेश बिश्नोई यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना पत्राद्वारे दिल्या आहेत. या सुनावणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची बाजू आयोगासमोर मांडावी, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहे.



आयोगाच्या पत्रानुसार, संबंधित अधिकाऱ्यांनी २३ जून २०२५ रोजी दिल्ली येथे प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक असल्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांनी अनुपस्थित राहिल्यास आयोगाने संविधानाच्या अनुच्छेद ३३८ (अ) नुसार कार्यवाही करण्याचा इशारा दिला आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने आमदार भीमराव केराम यांना देखील आयोगास आवश्यक माहिती व नागरिकांना उद्भवणाऱ्या समस्यांची माहिती सादर करण्याची विनंती करण्यात आली आहे. या सुनावणीमुळे स्थानिक नागरिकांच्या दीर्घकाळाच्या तक्रारींना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली असून, किनवट शहरातील शिवाजी नगर परिसरातील रेल्वे क्रॉसिंग अंडर ब्रीजचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### दिगांबर जगताप यांना कृषी खरीप हंगामचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**उमरी -**उमरी तालुक्यातील धानोरा बु. येथील भुमिपुत्र शेतकरी निष्ठवंत दिंगाबर जगताप यांना कृषी विभागाकडून खरीप हंगाम आदिवासी गटांमध्ये सोयाबीन या पिकात जास्त उत्पन्न काढल्याने त्यांना कृषी खरीप हंगाम आदिवासी गट पुरस्कार देण्यात येवून गौरव करण्यात आला आहे. सदर राज्यस्तरीय पीक स्पर्धा ही प्रयोगशील शेतकयांचे मनोबल वाढविणारी आहे. पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी, याकरिता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेत सहभागी व्हावे,दत्तकुमार कळसाईत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,नांदेड यांनी जाहीर केले होते,यात कृषी विभागाकडून खरीप हंगाम २०२४ - २०२५ करिता राज्यस्तरीय पीक स्पर्धा आयोजित केली होती. या पीक स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून मूग व सोयाबीन या पिकांचे योग्य व्यवस्थापन करून हजारांचे पारितोषिकास क्रमांक भरघोस उत्पन्न घेत नांदेड जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांने राज्यात प्रथम तर तिघांनी वेगवेगळ्या प्रकारात तृतीय क्रमांक पटकावून जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग केले जातात.अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा गौरव करत मनोबल वाढण्यासाठी तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यात कृषी विभागामार्फत राज्यस्तरीय पीक स्पर्धा योजना राबविण्यात आली,या पीक स्पर्धेत सोयाबीन या पिकामध्ये आदिवासी गटामध्ये सह प्रथम अर्धापूर तालुक्यातील सुभाष विश्वनाथ यलसटवाड यांनी राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावत ५० हजारांचे पारितोषिक मिळविले, तर उमरी तालुक्यातील दिगंबर गंगाराम जगताप धानोरकर यांनी आदिवासी गटामध्ये सोयाबीन या पिकात राज्यस्तरावर तृतीय क्रमांक ३० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले आहे.या शेतकरी निष्ठ दिंगाबरराव जगताप धानोरकर यांनी हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळवल्याबद्दल त्याचं कौतुक जिल्हा भरात होत आहे, यावेळी सुधाकरराव देशमुख धानोरकर, सरपंच ईरबा तुकाराम टोंपे, उपसरपंच कैलास देशमुख धानोरकर,पत्रकार उद्धव मामडे, संजय कदम,अनिल मेडेवाड,दता सलगरे,मोहन बळवंते,हणमंत सोगे यांच्यासह शारदा विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, कर्मचारी,व गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

उमरी भाजप नेते सुधाकरराव देशमुख यांनी गावच्या भूमिपुत्र दिंगाबर जगताप यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करून पेढे वाटून आनंद व्यक्त केला आहे.

# विद्यार्थ्यांनी गुणवत्तेसह अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगावे : डॉ.गणेश जोशी

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.१५ जून -**

विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आपल्या विद्यार्थी दशेत शैक्षणिक गुणवत्तेसह देशसेवा करण्याच्या उद्देशाने अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगावे, यासाठी पालकांनीही त्यांना त्याहेतूने दररोज प्रेरणात्मक उपदेश करत त्यांची शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढेल याकडे लक्ष द्यावे!, असे प्रतिपादन व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांनी माहूरच्या मॉडर्न इंग्लिश स्कूल येथे दि.१५ जून रोजी व्हाईस ऑफ मीडियाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व पालकांचा सत्कार समारोह' प्रसंगी केले.



माहूर शहरासह तालुक्यात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या मॉडर्न इंग्लिश स्कूल येथे व्हॉइस ऑफ मीडियाकडून वर्धापन दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गडावरील आनंदधाम आश्रमाचे मठाधिष, राष्ट्रसंत तथा महाराष्ट्र शासनाने स्वच्छता अभियानाचे ब्रँड म्बेसिडर म्हणून नियुक्त केलेले दभप साईनाथ महाराज वसमतकर हे होते. तर या कार्यक्रमासाठी व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष डॉ.गणेश जोशी यांची सपत्नीक उपस्थिती होती. यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाचे माहूर तालुका अध्यक्ष विजय आमले, मॉडर्न इंग्लिश स्कूलचे संस्थापक अजिज खान, श्री जगदंबा हायस्कूलचे मुख्याध्यापक विश्वास जाधव यांनी मनोगत व्यक्त केल्यानंतर जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून दहावी-

बारावीनंतर काय करावे,तसेच पालकांनी विद्यार्थ्यांची आवड-निवड लक्षात घेऊन त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहीत करत राहावे,जेणेकरून त्यांच्या मनात देश सेवा करण्यासाठी अधिकारी बनण्याची स्वप्ने उराशी बाळगली जाऊन विद्यार्थीही आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवतील असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष दभप साईनाथ महाराज वसमतकर यांनीही विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.यावेळी सैनिक स्कूल परीक्षा उत्तीर्ण झाल्याने निशांत वट्टमवार,कुमारी राणी गुलाबराव माळवे हिची गटविकास अधिकारी म्हणून निवड झाल्याने तिचा विशेष सत्कार करून सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पत्रकार पद्माताई गिऱ्हे, स्वातीताई आडे, भाऊ पाटील हडसणीकर यांचेसह ज्येष्ठ पत्रकार वसंतराव कपाटे, नंदकुमार जोशी, इलियास बावाणी, नितेश बनसोडे, अपील बेलखोडे, फिरोज पठाण, संजय बनसोडे,जयंत गिऱ्हे,गोपाल खापर्डे, सय्यद किरमानी तसेच गुलाबराव माळवे,पुरी महाराज तथा सत्कारमूर्ती विद्यार्थी,पालक,शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सूत्रसंचालन केंद्रप्रमुख एस.एस. पाटील यांनी केले तर आभार व्हॉइस ऑफ मीडियाचे माहूर तालुका अध्यक्ष विजय आमले यांनी मानले.

# खोट्या दिव्यांग प्रमाणपत्रांची तपासणी करून कार्यवाही करा: माधवराव देवसरकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.१५ जून -**

नांदेड जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील कर्मचारी, अधिकारी, ग्रामसेवक, केंद्र प्रमुख व शिक्षक यांच्या होत असलेल्या सार्वत्रिक बदल्यात स्वतःचे, पत्नीचे, पाल्याचे खोटे दिव्यांग प्रमाणपत्र काढून संवर्ग एक मधून लाभ घेतलेल्यांची जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथून शारीरिक तपासणी करून बोगस दिव्यांगावर गुन्हा दाखल करून निलंबित करण्यात यावे, अशी मागणी माधवराव पाटील देवसरकर यांनी जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यात खोटे दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्याचे मोठे रॅकेट असून एका प्रमाणपत्रास एक लाख रूपये देऊन अनेक अधिकारी-कर्मचारी यांनी स्वतः किंवा पत्नीचे, पाल्याचे खोटे दिव्यांग प्रमाणपत्र काढून आपल्या जिल्हा परिषदेतील शिक्षण विभाग, आरोग्य, बांधकाम (दक्षिण/उत्तर/मध्य), कृषी विभाग, पाणी पुरवठा, महिला व बालविकास विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी या वर्षीच्या सार्वत्रिक बदलीमध्ये लाभ घेतलेला आहे.

# ऑपरेशन सिंदूरची समाज माध्यमावर खिल्ली उडवणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.१५ जून -**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ पूर्ण भारतात संतापाची लाट उसळली होती प्रत्येक भारतीयांची भावना लक्षात घेता देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आतंकवादने ग्रस्त असलेल्या शेजारी देशास मुहतोड जवाब देण्याकरिता एक ऑपरेशन राबवले त्यास ऑपरेशन सिंदूर असे नाव देण्यात आले होते. या ऑपरेशनचे स्वागत पूर्ण देशात झाले होते पण हदगाव तालुक्यात राहणाऱ्या एका व्यक्तीने या ऑपरेशनची समाज माध्यमांवर खिल्ली उडवत इतकेच नव्हे तर संवैधानिक पदावर बसलेले देशाचे प्रधानमंत्री यांचे फोटो मोर्फ करून त्यावर आक्षेपहार्य विधान केल्याने हदगाव भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील यांच्या फिर्यादी वरून विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून यामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

समाज माध्यमांवरती शंकर चंद्रवंशी या नावाने खाते उघडून ऑपरेशन सिंदूर मध्ये भारतीय सैनिकांनी दाखविलेल्या धाडस व शौर्याबद्दल आक्षेपाहर्य, अपमानजनक व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केल्याने त्या व्यक्तीने सिंदूर लावलेल्या महिलेचा फोटो टाकून त्यावर पंतप्रधान यांचा फोटो मोरफ करत भक्तो की सिंदूर वाली चाची असा उल्लेख केला इतकेच नव्हे , तर भारताच्या संवैधानिक पदावर असलेल्या पंतप्रधान यांच्या विरोधी ही खालच्या स्तरावर व्हिडिओ, फोटो व मजकूर प्रसारित केल्याने आमच्या भावना दुखवल्याबद्दल बाळा पाटील यांच्या फिर्यादीवरून संबंधित व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

**भारतीय सैनिकांबद्दल व प्रधानमंत्री पदाबाबत सार्थ अभिमान : बाळा पाटील**



भारतीय सैनिकांनी दाखविलेल्या धाडस व शौर्याबद्दल नेहमीच संपूर्ण भारतीय नागरिकांच्या मनात त्यांचे नेहमीच आदराचे स्थान राहिलेले आहेत तसेच संविधानिक पदावर असलेल्या प्रधानमंत्री बद्दल समाज माध्यमांवरती दुष्प प्रचार करणारे अशा मानसिक रोगाने ग्रस्त असलेल्यांसाठी यापुढे असले अपमान खपवून घेतले जाणार नसल्याचे गर्भित इशारा हदगाव भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील यांनी यावेळेस दिला.

# नांदेड महानगरपालिका आराखडा बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१५ जून -**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका शहराचा पुढील २५ वर्षाचा विकास आराखडा तयार करून प्राधिकरण करण्याकरिता बैठकीचे आयोजन करावे अशी मागणी शिवसेना मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नामदार हेमंत पाटील यांनी केली . यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर,आमदार आनंदराव बोंढारकर यांची उपस्थिती होती.

मराठवाड्यात छत्रपती संभाजी नगर नंतर महत्वाचे शहर म्हणून नांदेड ओळखले जाते सध्या शहराची लोकसंख्या १० लक्ष झाली असल्यामुळे महानगरपालिकेची हद्द वाढविणे गरजेचे आहे. शहराच्या आजूबाजूस २० किमीपर्यंत मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग होत असून त्याठिकाणी कोठेही नगरविकास खात्याच्या नियमाप्रमाणे रस्ते सोडलेले नाहीत. पार्किंग करिता मोकळ्या जागा नाहीत, खेळाचे मैदान व बगीचे याकरिता नियमानुसार जागा राखीव ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे शहराच्या आजूबाजूच्या परिसरात एक मोठे खेडे तयार झाल्यासारखे वातावरण होत आहे. त्याचबरोबर ठिकठिकाणी अनिर्बंध बाधंकामे होत असून त्यामुळे नांदेड शहर हे विद्रुप झालेले आहे. पूर्वीपासून नांदेड शहराची ऐतिहासिक शहर म्हणून ओळख आहे. त्यास या बाबींमुळे गालबोट लागत आहे. करण्यात आली.यापूर्वी सुद्धा नांदेडच्या शिष्टमंडळाने नामदार हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली होती. त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद देत एकनाथ शिंदे यांनी तात्काळ बैठक आयोजित करण्याचा सूचना संबंधित विभागाला दिल्या होत्या आज पुन्हा या संदर्भात भेट घेतली.व पुढील २५ वर्षाचा विकास आराखडा तयार करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात यावी अशी मागणी केली .

# पावडेवाडी ३३ केव्हीं उपकेंद्रातील पावर ट्रान्सफॉर्मेर क्षमतेमध्ये वाढ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१५ जून -**

महावितरण नांदेड परिमंडळ अंतर्गत नांदेड शहर विभागातील पावडेवाडी ३३ के.व्हि. उपकेंद्र परिसरातील ग्राहकांना योग्य दाबाने, अखंडित व दर्जेदार वीज पुरवठा करण्याकरिता मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (चडघतध) योजने अंतर्गत अतिभारीत (ओव्हर लोडेड) असलेले पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविण्यात आली आहे. ३३/११ केव्ही उपकेंद्रातील ५ चत पॉवर ट्रान्सफॉर्मर ची क्षमतावाढ करून १० चत करण्यात आली ज्यामुळे पावडेवाडी उपकेंद्र परिसरातील काबरा नगर, फरांदे नगर, नसरतपूर, मोर चौक, शिक्षक कॉलनी, एकता नगर, संविधान चौक, लोक विहार कॉलनी इत्यादी भागातील जवळपास ८ हजार ग्राहकांना आता योग्य दाबाने वीज पुरवठा होत आहे. अधीक्षक अभियंता पायाभूत आराखडा निधी गौतम यांच्या हस्ते पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वीत करण्यात आला त्यावेळी



कार्यकारी अभियंता शहर विभाग विनय घनबहादूर अतिरिक्त कार्यकारी अभियंता भारती व सहाय्यक अभियंता बोधनकर, खिल्लारे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

या बदल पावडेवाडी परिसरातील वीज ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा होत असल्यामुळे ग्राहकांकडून महावितरणच्या MSKVY २.० योजने बद्दल समाधान व्यक्त होत आहे...

# नायगाव तालुक्यातील कृषी सेवा केंद्रातून बियाणे- खते चढ्या दराने विक्री

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.१५ जून -**

खरिप हंगाम तोंडावर असतानाच नायगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणींना पूर आला आहे.नरसी येथील एका कृषीसेवा केंद्रावर अधिकृत दरांपेक्षा जास्त दराने खते व बियाणे विक्री केल्याचे प्रकरण समोर आले असून, या प्रकारामुळे शेतकरी वर्गात तीव्र संतापाचे वातावरण आहे.

तालुक्याचे कृषी अधिकारी देवरे सध्या रजेवर आहेत, तर प्रभारी अधिकारी या प्रकाराकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांनी केला आहे. सत्तेच्या छत्रछायेखाली हे खुलेआम सुरू आहे, आणि प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहे, असा संतप्त सूर शेतकऱ्यांमध्ये ऐकायला मिळतो आहे. दरवर्षीच असाच प्रकार होतो. पण यावर्षी हे फारच उघडपणे हा प्रकार सुरू आहे, अशी नाराजी शेतकरी वर्गातून होत आहे या गंभीर प्रकारा कडे कृषी विभागातील अधिकार्याने तात्काळ चौकशी करून संबंधित विक्रेत्यांवर कार्यवाही करावी अन्यथा तालुक्यातीलकृषी विभाग जर गप्प बसत असेल, तर आम्ही शेतकरी गप्प बसणार नाही, असा सज्जड इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

**दरवाढीचा थेट फटका ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना : मनोहर कदम**

नरसी परिसरात बियाण्यांच्या अधिकृत दरावर विक्री ऐवजी १५ ते २५ टक्क्यां पर्यंत वाढीव दर आकारले जात असल्याचे शेतकऱ्यां चे म्हणणे आहे. काही प्रकरणांत खतेही शासकीय दर पत्रकापेक्षा अधिक किमतीत विकले जात अस ल्याची माहिती समोर येत आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना आता अशा आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे कांडाळा येथील शेतकरी मनोहर कदम यांनी सांगीतले.

**कृषी केंद्रावर कारवाई आवश्यक : श्रावण भिलवंडे**

३३४४ या सोयाबीन बी-बियाण्यांच्या दरांमध्ये नरसी येथील काही परवानाधारक कृषीसेवा केंद्र चालकां नी शासनाच्या दरपत्रका पेक्षा ही चढ्या दराने विक्री होत असल्याचे नरसीसह परिसराच्या गावातील काही निवडक शेतकऱ्यांनी आपली आपबिती नरसी येथील भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस श्रावण भिलवंडे नां सांगितले आसता यावेळी त्यांनी तात्काळ तालुक्यातील कृषी विभागातील अधिकाऱ्यांशी काळजी पुर्वक विचारुन अशा कृषी सेवा केंद्र चालकांवर कठोर कारवाई करावी लागेल अशी तीव्र शब्दात नायगांव तालुक्यातील कृषी विभागा बद्दल नाराजी यावेळी व्यक्त केली.

# शाळांना भेटी उपक्रमांतर्गत लोकप्रतिनिधी व अधिकारी देणार शाळांना भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१५ जून -**

शालेय शिक्षण विभागाच्या १०० शाळांना भेटी या विशेष उपक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व अधिकारी येत्या १६ जून रोजी, शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी स्वतःच्या मतदारसंघातील किंवा जवळच्या शाळेला भेट देतील. विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करून, शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, मूलभूत सुविधा व कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेतला जाईल.

जिल्ह्यातील सर्व २ हजार १८५ जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशोत्सव राबविण्यात येणार असून यंदा पहिल्यांदाच लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट सहभाग या उपक्रमाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यात आला आहे. यामुळे शाळा प्रशासन, पालक व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय वाढण्यास मदत होणार आहे.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा भेटींचे नियोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी संबंधित लोकप्रतिनिधी शाळांना भेट देतील. नांदेड जिल्हयाचे पालकमंत्री अतुल सावे हे विष्णुपूरी येथील जिल्हा परिषद हायस्कुल येथे भेट देणार आहेत. खासदार रवींद्र चव्हाण हे जिल्हा परिष्द हायस्कुल घुंगराळा, खासदार अशोक चव्हाण जिल्हा परिषद हायस्कुल नुतन भोकर, खासदार डॉ. अजित गोपछडे जिल्हा परिषद हायस्कुल लोहगाव, आमदार प्रतापराव चिखलीकर जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा सोनखेड, आमदार डॉ. तुषार राठोड जिल्हा परिषद हायस्कुल कन्या शाळा मुखेड, आमदार रोजश पवार जिल्हा परिषद हायस्कुल कुंटूर, आमदार श्रीजया चव्हाण जिल्हा परिषद हायस्कुल मुगट, आमदार बालाजी कल्याणकर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा निळा, आमदार हेमंत पाटील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पासदगाव, आमदार आनंदराव तिडके बोंढारकर जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा, जवाहरनगर तुप्पा, आमदार बाबुराव पाटील कोहळीकर जिल्हा परिषद कंद्रीय प्राथमिक शाळा, निवघा, आमदार भिमराव केराम जिल्हा परिषद हायस्कुल बोधडी (बु) येथे भेट देणार आहेत. तर जिल्हाधिकारी राहूल कर्डिले- जिल्हा परिषद हायस्कुल वाघी, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली- जिल्हा परिषद हायस्कुल तामसा, जिल्हा पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार- जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय प्राथमिक शाळा वाजेगाव, नांदेड-वाघाळा माहानगरपालिकेचे आयुक्त- जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वसरणी येथे भेट देणार आहेत. तसेच जिल्हयातील सर्व वर्ग-१ व वर्ग-२ अधिकारीही विविध शाळांना भेटी देणार आहेत.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व मुख्याध्यापकांनी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून तयारी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा परिषेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, शिक्षणाधिकारी योजना दिलीपकुमार बनसोडे, उपशिक्षणाधिकारी नागराज बनसोडे, उपशिक्षणाधिकारी अवधूत गंजेवार यांनी केले आहे.

शाळेच्या पहिल्या दिवशी विशेष उपक्रम- इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे फुल देऊन स्वागत करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर त्यांना पुस्तक व पेन्सिलचे वाटप करण्यात येईल. स्मरणशक्तीवर आधारित बुद्धीचे खेळ आयोजित केले जातील. समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत विद्यार्थ्यांची उंची, वजन मोजणे आणि इतर प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात येतील. प्रत्येक विद्यार्थ्याचा उजव्या हाताचा ठसा चार्ट पेपरवर घेऊन तो वर्गात लावण्यात येईल. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून स्मरणघडी पत्रिका भरून घेतली जाईल. ही पत्रिका २०३५ साली उघडून त्या दिवसाचे स्मरण करण्याचा संदेश दिला जाईल. तसेच इयत्ता पहिलीतील प्रवेशित विद्यार्थी, मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक यांचा सामूहिक फोटो काढण्यात येईल. या फोटोची प्रत प्रत्येक विद्यार्थ्याला वितरित केली जाईल.

**जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली प्रवेशासाठी विशेष उद्दिष्ट**

जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिलीसाठी यावर्षी एकूण ३२ हजार ५९ विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहेत. मात्र गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने यंदा दहा टक्के जास्तीचे उद्दिष्ट ठेवून प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यानुसार एकूण सुमारे ३५ हजार २६५ विद्यार्थ्यांचे प्रवेशाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळात भारताने सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाचा आर्दश उभा केला -मा.केंद्रीय राज्य रावसाहेब दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षाच्या यशस्वी कार्यकाळात भारताने सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाचा एक नवीन आर्दश उभा केला. गेल्या ११ वर्षांत देश विकासाच्या दिशेने वेगाने पुढे सरसावला असल्याचे प्रतिपादन भाजपा जेष्ठ नेते व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केले.



जालना येथे भाजपा जिल्हा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत श्री. दानवे बोलत होते. यावेळी पत्रकाराशी बोलतांना दानवे म्हणाले की, ११ वर्षाच्या कार्यकाळामध्ये केंद्र सरकारने तंत्रज्ञ-ानाचा प्रभावी वापर केला तर , विकासाला गती मिळते भाजपा सरकार जेथे जेथे आहे, तेथे तेथे गरीबांचा विकास झाला आहे सरकार म्हणजे सेवा, या हेतूने आता काम केले जात आहे तसेच सुशासन ही देशाची संस्कृती बनली आहे. गेल्या ११ वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरु केली आहे. २०१४ पूर्वी सामान्य माणूस, अधिकारी हे कसे शक्य आहे, हे शक्यच नाही. असे म्हणत असे. आता गेल्या ११ वर्षातील मोदी सरकारने केलेली कामे बघता, ऋहोय, हे शक्य आहे, हे झालेच पाहिजे, मोदी सरकार असल्यामुळे हे नक्कीच होणारऋ, असे सामान्य माणूस मोठ्या विश्वासाने म्हणून लागला आहे. २०१४ पूर्वी देश भ्रष्टाचाराने पोखरला होता देशात अनेक घोटाळे घडत होते. देशात लांगुलचा-लनाचे राजकारण सुरू होते. मोदी सरकारने मात्र देशात विकासाचे युग सुरू केले. २०१४ पूर्वी सरकारी योजनांचे लाभ लाभार्थी जनतेपर्यंत पोहचत नसत. लाभार्थी जनतेला हे लाभ मिळविण्यासाठी मध्यस्थांकडे जावे लागे. मोदी सरकारने डीबीटी प्रणालीचा वापर करत सामान्य माणसाच्या थेट बँक खात्यात लाभ पोहचवण्याचे काम केले आहे. २०१४ पूर्वी सामान्य माणसाला वैद्यकीय उप-चारावर केल्या जाणा-या खर्चाची भिती वाटत असे. मोदी सरकारने ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत उपलब्ध केले आहेत. पूर्वी आपल्याला अनेक वस्तूंची आयात करावी लागत असे, आता मात्र मेक इन इंडियामुळे अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात करत आहोत. भारताच्या विकासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः कडे घेतले नसून १४० कोटी भारतीयांना याचे श्रेय दिले आहे ऑपरेशन सिंदूर मुळे सुरक्षित भारत, समृध्द भारत या मंत्राचा परिचय जगाला झाला आहे. भारतावर दहशतवादी मार्गाने हल्ला चढविला तर, दहशतवाद्यांच्या देशात घुसून जशास तसे उत्तर दिले जाईल, हे ऑपरेशन सिंदूर मुळे जगाला कळले आहे ऑपरेशन सिंदूर मध्ये भारतात बनवलेल्या शस्त्रास्त्रांनी, क्षेपणास्त्रांनी मोठी कामगिरी बजावली आहे. भारतात तयार केलेल्या शस्त्रास्त्रांची पाकिस्तानात यशस्वी चाचणी झाल्यामुळे भारतात बनवलेल्या संरक्षण उत्पादनांची विश्वासार्हता जगात तयार झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गरीबीचे पूर्णपणे उच्चाटन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्यानुसार गरीब कल्याण अन्न योजना, उज्वला योजना, आवास योजना, जलजीवन मिशन, जनधन योजना, आयुष्मान भारत, किसान सन्मान निधी अशा अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. श्री.दानवे यांनी यावेळी काही विरोधी पक्षांवर टीकास्त्र सोडत म्हणाले, काही नेते केवळ नुसते राजकारण करण्यात धन्यता मानतात. त्यांनी केवळ टीका करण्यापेक्षा विकासाच्या कामांवर लक्ष केंद्रित करायला हवे. आयत्या पिठावर रेघोट्या मारून श्रेय घेण्याचा प्रयत्न होणार नाही, याची जबाबदारी त्यांनी घ्यायला हवी. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या तत्त्वावर मोदी सरकारने आजवर काम केले आहे. आणि या वाटचालीत १४० कोटी भारतीयांचा सक्रिय सहभाग असल्यामुळेच भारत वेगाने प्रगती करत आहे, असे दानवे यांनी ठामपणे सांगितले. विकसीत भारताच्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे, असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेला भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे,जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे,सौ.विमलताई आगलावे, विजय कामड, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर भांदरगे,सौ.संध्याताई देठे,सौ.शुभांगीताई देशपांडे, सिध्दीविनायक मुळे, सोपानराव पेंढारकर, सुनिल खरे,महेश निकम, सतिष जाधव,अर्जुन गेही,धनराज काबलिये, शिवराज जाधव, शशीकांत घुगे, संजय डोंगरे, भगवान मात्रे, अमोल धानुरे, सुनिल पवार, विलास जऱ्हाड, विष्णु डोंगरे, बाबासाहेब कोलते, वसंत शिंदे, राजेंद्र भोसले, सतिष केरकळ, बबनराव सिरसाठ, देविदास देशमुख यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते व स्थानिक माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### गुणवंत विद्यार्थ्यांने देश हिताकरिता राजकारणात यावे – विनायक चोथे



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड: गुणवंत विद्यार्थ्यांनी केवळ मेडिकल इंजिनिरींग यासारख्या क्षेत्रात गुणवत्ता सिद्ध न करता राजकीय क्षेत्रात येऊन देशाहिताकरिता योगदान द्यावे असे प्रतिपादन मराठवाडा विभागीय युवासेना सचिव व स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री. विनायक चोथे यांनी अंबड येथील स्वामी समर्थ मंदिर सभागृहात आयोजित अंबड तालुका १० व १२ विच्या गुणवंताच्या गुणगौरव व सत्कार समारंभाच्या प्रसंगी केले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन मा. आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेना- युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ शहागड यांच्या सयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. पुढे बोलतांना श्री चोथे म्हणाले कि राजकारणात गुणवंतानी सहभाग घेतला तर देशाची प्रगती उचावेल व राजकीय दिशेला पण एक नवीन वळण मिळेल. मा. ठाकरे यांच्या प्रेरणेतून आम्ही पण राजकरणातून समाजकार्य करण्याकरिता प्रेरित झालो असून आपण आपल्या आईवडीलाच्या कष्टातून प्रेरणा घेऊन त्यांची मान समाजात उंचावेल असे कार्य करावे. वयाच्या १८ ते २८ या काळात आपण सर्व आईवडीलांच्या प्रति असलेली कर्तव्य व जबाबदाऱ्या योग्यरीतीने पार पाडल्या पहिजे. केवळ गुणांच्या टक्केवारी वर यशाचे स्वरूप न ठरवता ज्या क्षेत्रात गेलात त्या क्षेत्रात जबाबदारी व ध्येयाने वाटचाल केली पाहिजे असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात अंबड तालुक्यातील १४२ गुणवंताचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक विनायक चोथे, त्याच प्रमाणे उपस्थितीमध्ये भानुदास घुगे, हनुमान धांडे, पंडित गावडे, श्रीमंत खटके, बंडूकाका पागिरे,दिनेश काकडे, कल्याण टकले, कुमार रुपवते, राम लांडे, नंदकिशोर पुंड,सिद्धू जऱ्हाड, गोपाल जवळकर, सुरेश जगताप,विष्णू देवडे, विजय कोठाडे,सतीश धुपे, मुकुंद हुसे, अनिस तांबोळी,सुदाम काळे, गणेश मुळे, बाळासाहेब गावडे, अभिजीत खटके, गणेश गायकवाड, गोकुळ बारवाल, गौतम खरात, लक्ष्मण काकडे, बाळासाहेब तारडे, अमोल टोपे, शाम राठोड, कल्याण टकले, अनिरुद्ध भागवत आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. मारोती घुगे यांनी केले तर प्रास्ताविक इजाज शेख यांनी केले यावेळी कु. शिवाजली घुगे, शिवकन्या बिन्नीवाले व मिसबाह पटेल या विद्यार्थीनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सुनील सामग यांनी केले तर सदरील कार्यक्रमास जगन दुर्गे, महेश गोडबोले, संतोष वाघ, भगवान मिरकड, एकनाथ मिटकर, एजाज शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, युवासैनिकांनी परिश्रम घेतले.



### डॉ.संजय पुरी यांना राज्य शासनाचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

परतुर येथील भटके विमुक्त मागासवर्गीय व आदिवासी समाज विविध सामाजिक उपक्रमातून सेवाकार्य करणारे डॉ. संजय पुरी यांना राज्य सरकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून राज्यपालांना दिला जाणारा फुल-शाहू आदेदकर पुरस्कार- त्यांना मुख्यमंत्री दिलांबी लाभार्थी प्रदान करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ उपक्रम, सामाजिक मंत्री संजय शिरसाठ, मंत्री संजय राठोड आदिंची प्रमुख न्यायमूर्ती होती. त्यांचे कार्यकर्ते व त्यांना निवडल्या गेलेल्या पुरस्काराचे स्व-गताध्यक्ष आमदार बबनराव लोणीकर, भाजपचे युवा राहुल लोणीकर यांनी अभिनंदन केले.

## जन सामान्यांच्या कामामधून, येणाऱ्या निवडणुका जिंकून दाखवू -आ.नारायण कुचे

### परतूर नगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकवणारच -भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांचे विचार तळागाळातील प्रत्येक घराघरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची असून, सबका साथ सबका विकास सबका विश्वास हे मोदीजींचे ब्रीद ध्यानात घेऊन कार्यकर्त्यांसोबत समरस होत संघटना वाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी काम करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

ते परतुर येथे भाजपा च्या तालुका कार्यकारणी व विविध आघाड्या प्रकोष्ट च्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र वाटप समारंभ तसेच नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आ नारायण कुचे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते



यावेळी व्यासपीठावर, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, परतूर मंडळाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले बद्रिनारायन ढवळे अशोकराव बरकुले महिला आघाडी तालुकाध्यक्ष छायाताई घोरबांड भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सतोनकर आदींची प्रमुख उपस्थिती होती

दरम्यान जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या सत्काराच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका महान-गरपालिकेचे रणसिंग फुंकले असल्याची चर्चा जोरदारपणे चर्चिली जात होती

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की , आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती जालना महानगरपालिका व नगरपालिका निवडणुकीमध्ये आपल्या सगळ्यांना जिद्दीने उतरायचे असून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सत्ता मिळवायचे असल्याचे यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की

पक्ष संघटनेत काम करत असताना तुझा भाऊ न बाळगता कार्यकर्त्यांच्या माध्यमातून थेट तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या योजना पोहोचवण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे आमदार लोणीकर म्हणाली की, भारतीय जनता पार्टीची एकनिष्ठ राहणाऱ्या कार्यकर्त्याला पक्षाच्या माध्यमातून विविध पदावर काम करण्याची संधी दिली जाते व त्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्याचे काम पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून व्हावे अशी अपेक्षा यावेळी त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली पुढे बोलताना ते म्हणाले की केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार यांच्या माध्यमातून अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जात असून या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले परम कर्तव्य असून हे करत असतानाच संघटनेत नवयुवक, युवतींना संघटनेत प्रवाहित करण्याची जबाबदारी ही आपली असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे म्हणाले की, पक्ष संघटनेचे काम करत असताना स्वतःला झोकून देत पदाधिकाऱ्यांनी जीवाचे रान करून गावागावा पर्यंत संघटना पोहोचवत येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वच आघाड्यांवर भारतीय जनता पार्टीला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत रहावे, या माध्यमातून वाडी वस्ती झोपडपट्टीवरील कार्यकर्ता भारतीय जनता पार्टीच्या विचाराशी जोडण्यासाठी पोषक वातावरण तयार करून या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी पदाधिकाऱ्यांची असल्याचे सांगितले

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की , पदाधिकारी म्हणून आपली जबाबदारी चोखपणे निभावताना ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांची जाळे निर्माण करतानाच येणारी परतूर नगरपालिकेचे निवडणूक आपण जिंकणारच असा विश्वास व्यक्त केला

आपले सर्वांचे नेते आमदार बबनराव लोणीकर सक्षम असून, येणाऱ्या अडचणीवर मात करत आपल्याला प्रत्येकाला संघटनेला बळकटी देण्याचे काम करावयाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

## खाजगी शाळांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवा; अन्यथा आंदोलन करणार -कडुबा बोरसे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

खाजगी शाळांच्या फीस वसुलीवर नियंत्रण ठेवून विद्यार्थ्यांना अध्यापनासह मूलभूत सुविधा वेळेत प्राप्त करून देण्यात यावी याकरिता आम आदमी पार्टीच्या वतीने येथील गटशिक्षणाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली, मागणी मान्य न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असा इशारा आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिला, या निवेदनात म्हटले आहे की खाजगी शाळा मनमानीपणे फिस वाढवत आहे सर्व साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती पालकांना करतात व त्यातूनही कमिशन लाटतात असा आरोप देखील यावेळी करण्यात आला आहे . नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असल्याने खाजगी संस्थेच्या शाळा पालकाकडून मनमानीपणे फिस वसूल करतात. त्यावर आपले नियंत्रण असावे असा सल्ला देखील यावेळी गट शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. तसेच पहिल्या दिवसापासून विद्यार्थ्यांना शाळेत जरी बोलवले गेले तरी प्रत्यक्ष अध्यापन सुरू होत नाही. अनेक शाळांच्या मध्ये मुत्रीची स्वच्छतागृहांची तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आढळून येत नाही.लाईट व फॅनची व्यवस्था नाही.शाळा सुरू झाल्यानंतर अनेक दिवस विद्यार्थ्यांना वेळापत्रक दिले जात नाही.या सर्व बाबी गुणवत्तेसाठी मारक ठरतात.विद्यार्थ्यांची कुचंबना होते.तरी अशा प्रकारे गैरसोय होऊ नये



यासाठी वेळेत जिल्हा परिषदेच्या शाळेसह सर्व खाजगी शाळांना सूचना देण्यात याव्यात. विशेषतः सर्व माध्यमांच्या खाजगी शाळांच्या फीस वसु-लीवर नियंत्रण ठेवून विद्यार्थ्यांना अध्यापनासह मूलभूत सुविधा वेळेत प्राप्त करून देण्यात याव्यात.याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठवण्यात यावा.सहकार्याची अपेक्षा! योग्य कार्यवाही न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असा इशारा देण्यात आला आहे या निवेदनावर कडूबा बोरसे गुरुजी उप जिल्हाध्यक्ष जनार्दन पाटील सोळंके, तालुकाध्यक्षआम आदमी पार्टी भोकरदन,महेजाद खान शहराध्यक्ष आम आदमी पार्टी भोकरदनफारुख भाईशहर उपाध्यक्षआम आदमी पार्टि भोकरदन नाडे साहेब यांच्यासह आधीच्या स्वाक्षऱ्या आहेत,

## रक्तदान करुन जागतिक रक्तदान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



जागतिक रक्तदान दिनानिमित्त अंबड शहरातील २५ ते ४० वयोगटातील तरुणांनी डाँ.इकबाल उर्दू स्कुल येथे आयोजित रक्तदान शिबीरात विठ्ठल शेटे,संतोष वाघ,राहुल बांडे,जहीर कुरेशी,सद्दाम कुरेशी,आरेश शेख,जाकेर शेख,शहबाज शेख,रईस कुरेशी,समीर शेख,शेख शाकेर,अफरोज पठाण, फेरोज शेख,नईम पठाण,सलमान चाऊस,एजाज खतीब सह तब्बल पन्नास रक्तदात्यांनी आज दि.१४ रोजी रक्तदान केले.वरुडी येथील नुर हाँस्पीटलच्या रक्तपेढीचे डाँ.इम्तियाज शेख,डाँ.बुशरा पारेख,डाँ.सभा,करामत खान,जनसंपर्क अधिकारी विवेक मोरे यांचेसह आयोजक इंशा अल्ला ग्रुपचे अन्वर कुरेशी,फारुख टेलर,अजहर तांबोळी,रईस मनियार,जबीर तांबोळी,फय्याज तांबोळी, सय्यद तौफिक,फेरोज खान,अस्लम जहागीरदार, कौसर शहा उपस्थित होते.

## टाकळखोपा अवैध वाळू उपसाचे 'हब'

### दररोज शेकडो ब्रास वाळूची वाहतूक, प्रशासनाची डोळेझाक?

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

तालुक्यातील टाकळखोपा गाव हे अवैध वाळू उपसा व विक्रीसाठी केंद्रबिंदू ठरत असून, दररोज शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक येथे सुरू आहे. यामुळे शासनाच्या महसूल विभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या वाळू तस्करीतून लाखोंचा व्यवहार होत असून या धंद्यासाठी प्रशासनातील ठराविक अधिकारी व कर्मचाऱ्यांना दरमहा ५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंतचे हप्ते दिले जात असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. त्यामुळे सर्व विभाग गप्प बसल्याचे चित्र आहे.

शासनाच्या मोफत वाळू योजनेला हरताळ फासला जात असून स्थानिक प्रशासन, आणि राजकीय नेत्यांची मिलीभगत उघड झाली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी उबाठाचे तालुका उपप्रमुख ज्ञानेश्वर सरकटे यांनी केली आहे.

#### महसूल व स्थानिक राजकारण्यांची छुपी युती?

पुर्णा नदीकाठच्या या वाळू उपसाच्या अवैध धंद्याला महसूल यंत्रणेची छुपी साथ असल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे तर गावातील सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी यांचेही यात सक्रिय सहभाग असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सामान्य ग्रामस्थांनी याबाबत गप्प राहणेच पसंत केले आहे. कोणीतरी आवाज उठवतो पण पैशाची तडजोड करून त्यालाही गप्प बसवले जाते; उलट हेच लोक आर्थिक तडजोडीच्या नावाखाली टार्गेट केले जातात.

#### किनीद्वारे नदीतून थेट वाळू उपसा ; चार जिल्ह्यांत विक्री

जालना व हिंगोली जिल्ह्यातील सिमेलगतचा देवठाणा- खोरवड- बन या गावच्या हद्दीतून किनीद्वारे पुर्णा नदीपात्रातून थेट वाळू उपसा करून ती लोणार (जि.बुलढाणा), जिंतूर (जि.परभणी), रिसोड (जि.वाशिम) व सेनगाव (जि.हिंगोली) या ठिकाणच्या बांधकाम ठिकाणी चढ्या दराने विकली जाते.

#### गांवच्या रस्त्यांची दुरवस्था!

वाळू वाहतुकीचा वाहनांमुळे तळणीसह परिसरातील कानडी- देवठाणा- बन , उस्वद- नरडोह - मंठा , कानडी- तळणी , शिरपूर- कोकरबा- वडगाव , वाघाळा- टाकळखोपा- इंचा- पुर्णा पाटी, किर्ला-दुधा , उस्वद- हनवतखेडा- गारटेकी , भुवन-वझर सरकटे- बैलोरा चौफुली या ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः दुरावस्था झाली आहे.

वाघाळा- टाकळखोपा- इंचा मुख्य रस्ता मोठमोठ्या खड्ड्यांनी विद्रूप झाला आहे.

#### तीन टिप्पर पकडले; मात्र माहिती गोपनीय?

महसूल विभागाने अवैध वाळू वाहतूक करणारे केवळ तीन टिप्पर पकडल्याचा दावा केला आहे. मात्र त्या वाहनांचे क्रमांक, चालक आणि मालकांची माहिती देण्यास महसूल यंत्रणा टाळाटाळ करत आहे. पंचनामा सोमवारी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून दिला जाईल, असे प्रभारी तहसीलदार कल्याण काळदाते यांनी सांगितले. तर तळणी मंडळ अधिकारी संजय उफाड यांनी ही माहिती तहसील क्लर्क संतोष गायकवाड यांच्याकडे आहे असे सांगून जबाबदारी झटकली. गायकवाड यांनी मात्र पंचनामा प्राप्त नाही असे सांगितल्याने विभागातील समन्वयाचा फज्जा उडाल्याचे स्पष्ट झाले.

#### घरकुल लाभार्थीही वंचित

राज्य शासनाने घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याचे जाहीर केले होते. प्रत्यक्षात केवळ १० टक्के लाभार्थ्यांनाच वाळू मिळाली असून उर्वरित ९० टक्के लाभार्थी अद्याप वाळू मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. शासकीय कामे आणि घरकुल योजनेच्या नावाखालीही वाळूची सर्रास अवैध वाहतूक सुरू असल्याचा आरोप आहे.

#### अवैध वाळू वाहतूक सुरू असलेली गावांची यादी

पुर्णा नदीकाठच्या बन - खोरवड , उस्वद , हनव-तखेडा - लिंबखेडा , टाकळखोपा, किर्ला , पोखरी केंधळे, भुवन व वझर सरकटे या गावांच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात वाळू उपसा आणि वाहतूक सुरू आहे.

#### अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवतात

महसूल विभागातील अधिकारी या संपूर्ण प्रकरणात एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी टाळण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाळू उपसा रोखण्यासाठी प्रशासन गांभीर्याने काम करत नाही हे स्पष्ट दिसून येत आहे.


## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,

**बीड यांचे कार्यालय**

शासकीय इमारत, चाँदमारी वसाहत धानोरा रोड बीड ४३११२२

**क्रमांक/आस्था/.२/एस.आर.१४७/२०२४/२५**

बीड दिनांक ०३/०६/२०२५

### जाहीर सुचना

प्रति
१) राधाकृष्ण हरीभाऊ साबळे
रा.जलालपुर ता.परळी वै.जि.बीड
**अपीलदार**

**विरूध्द**

१) शालुबाई भ्र.तुळशीराम बेंद्रे, रा.तिरोडा जि.गोंदीया,
ह.मु.थर्मल पावर स्टेशन उड्डाणपुलाच्या बाजुस, शिवाजी नगर, परळी वै.ता.परळी वै., जि.बीड
३) रविंद्र केशवराव गित्ते, रा.विद्यानगर, परळी वै., ता.परळी वै., जि.बीड
**जाबदार**

या जाहिर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरूध्द जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख बीड यांचे न्यायालयात मौजे जलालपुर ता.परळी वै.जि.बीड येथील घर मिळकत क्रं.६८६ सिटी सर्वे नं.४७५ चा दिनांक १५/०३/२०२२ रोजीचा फेरफार क्रं.७८४२ तसेच दिनांक १९/०७/२०२२ रोजीचा झालेला फेरफार क्रं.८११८ हे दोन्ही फेर रद्द करणे बाबत अपील महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरअर्जदार यांना जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक ०२/०७/२०२५ रोजी वेळ सकाळी ११.३० वाजता जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड बीड ता.जि.बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणी उपस्थित रहावे.

वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी घेण्यात येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत
**कृष्णा शिंदे**
जिल्हा अधीक्षक भूमि
अभिलेख बीड